cmyk

दैनिक राज्य लोकतंत्र

www.epaper.rajyaloktantra.com नवी दिशा... नवे विचार..... email:rajyaloktantra75@gmail.com

बीड – महाराष्ट्र | वर्ष–५ | अंक–१०७ | सोमवार, दि.११ ऑगस्ट २०२५ | RNI No.: MAHMAR/2021/85884 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | पाने–६ | किंमत ३ रूपये

## संपादकीय

### दुर्दैव ! अमेरिकेच्या खेळीवर भारताची मदार...

जुलै महिन्याच्या शेवटच्या आठवड्यात पाकिस्तानच्या लष्करप्रमुखांनी चीनचा दौरा केला. चीनला पाकिस्तानचा सर्वकालीन मित्र म्हणवणाऱ्या पाकिस्तानच्या लष्करप्रमुखांनी या दौऱ्यातही चीनची प्रशंसा केली. चीन आणि पाकिस्तान 'आयर्न ब्रदर्स' आहेत, असे पाकचे जनरल असीम मुनीर म्हणाले. त्याच सुमारास मुनीर यांचा अमेरिका दौराही झाला. अमेरिकेचे अध्यक्ष ट्रम्प यांनी मुनीर यांना भोजनासाठी बोलावले. त्यामुळे मुनीर चांगलेच भारावले. त्यांनी ट्रम्प यांचीही प्रशंसा केली.

### त्या वक्तव्याप्रकरणी शरद पवारांची चौकशी करा–आ.बंब

छ. संभाजीनगर–शरद पवारांनी विधानसभा निवडणुककीआधी दोन व्यक्तींनी आपल्याला १६० जागा जिंकून देण्याचे सांगितले होते. त्यामुळे त्या वक्तव्या प्रकरणी शरद पवारांची चौकशी करण्याची मागणी आ. प्रशांत बंब यांनी केली आहे. २०२४ च्या विधानसभा निवडणुकीपूर्वी दिल्लीत दोन लोक आपल्याला भेटायला आले होते. या लोकांनी आपल्याला १६० जागा जिंकवून देण्याची खात्री दिली होती, असा गौप्यस्फोट राष्ट्रवादी काँग्रेसचे संस्थापक शरद पवार यांनी केला होता. यावर भाजप आमदार प्रशांत बंब यांनी प्रतिक्रिया दिली आहे. त्या वक्तव्याप्रकरणी शरद पवार यांची चौकशी करावी, अशी मागणी प्रशांत बंब यांनी केली आहे.

# मराठवाड्यात नद्यांवरील बंधाऱ्यात मुबलक पाणीसाठा

## शेतकऱ्यांची चिंता मिटली; ८७९ प्रकल्प ६६ टक्के, मोठे ११ धरण ७९ टक्के भरले

**बीड । प्रतिनिधी**

**गेल्या मराठवाड्यात आठवडाभरापासून चांगला पाऊस होत असल्याने पाणी पातळीत वाढ होत असून नद्यांवरील बंधाऱ्यांमध्ये सध्या मुबलक पाणीसाठा आहे. तर मराठवाड्यातील ११ मोठ्या धरणात ७९ टक्के उपयुक्त पाणीसाठा तर ८७९ प्रकल्पात ६६ टक्के पाणीसाठा असल्याने शेतकऱ्यांची चिंता मिटणार आहे.**



गेल्या वर्षी चांगला पाऊस झाल्याने शेतकऱ्यांना सुध्दा चांगले दिवस आले होते. यंदा मात्र मे महिन्यात पाऊस झाल्याने पावसाळा कसा असेल याविषयी प्रश्नचिन्ह होते. त्यातच जुन आणि जुलै महिन्यात पावसाने ओढ दिल्याने शेतकऱ्यांची चिंता वाढली होती. मात्र गेल्या आठवडाभरापासून मराठवाड्यात चांगला पाऊस पडत असून मराठवाड्यातील ▶▶ पान २ वर

### जायकवाडीच्या तुलनेत माजलगाव धरण रिकामेच

मराठवाड्यातील अकरा मोठ्या प्रकल्पांपैकी माजलगाव प्रकल्प सर्वांत कमी २४ उपयुक्त पाणीसाठा झाला आहे. त्या पाठव पाठव मांजरा प्रकल्पातही केवळ ३३ टक्के उपयुक्त पाणीसाठा आहे. जायकवाडी प्रकल्पात ९२ टक्के, येलदरीत ८१ टक्के, सिद्धेश्वरमध्ये ६७ टक्के, ऊर्ध्व पैनगंगामध्ये ८५ टक्के, निम्न तेरणा ७९ टक्के, निम्न मनार ६१ टक्के, विष्णुपुरी ७० टक्के, निम्न दुधना ६० टक्के, सीना कोळेगाव ५७ टक्के उपयुक्त पाणीसाठा झाला आहे. बीड जिल्ह्यामधील १६ मध्यम प्रकल्पांत सर्वाधिक ६१ टक्के उपयुक्त पाणी साठले गेले आहे.

# खोक्याला जामीन मंजूर पण मुक्काम कोठडीतच

**बीड । प्रतिनिधी**

**शिरूर येथील सतीश भोसले उर्फ खोक्याचा जामीन अर्ज अखेर शिरूर कासार येथील प्रथम वर्ग न्याय दंडाधिकाऱ्यांनी हा जामीन अर्ज मंजूर केला आहे. आरोपी सतीश भोसले उर्फ खोक्या याच्याविरुद्ध वन्यजीव संरक्षण कायद्याअंतर्गत शिरूर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल झाला होता. सध्या खोक्य उर्फ सतीश भोसले हा बीड कारागृहातील न्यायालयीन कोठडीतच आहे.**



शिरूर पोलिसांनी खोक्याच्या घरावर छापा मारल्यानंतर वन्यप्राण्यांच्या शिकारीचे साहित्य, प्राण्यांचे मांस, गांजा आढळून आलं होता. याप्रकरणी अँडव्होकेट राजन धसे यांनी युक्तिवाद केला. त्यानुसार शिरूर कासार येथील प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी यांनी त्याचा जामीन अर्ज मंजूर केला .शिरूरमधील दिलीप ढाकणे आणि त्याचा मुलगा महेश ढाकणे यांना मारहाण केल्याचा व्हिडिओ समाज माध्यमांवर व्हायरल झाल्यानंतर सतीश भोसले उर्फ खोक्याचे दहशत चर्चेचा विषय बनली होती. गुन्हेगारी पार्श्वभूमी असलेल्या सतीश भोसले विरोधात गंभीर गुन्ह्यांच्या नोंदी आहेत. प्राणघातक हल्ला, फसवणूक, खूनाचा गुन्हा असे वेगवेगळ्या ▶▶ पान २ वर

# १२ लाखांपर्यंतची टॅक्स फ्री मर्यादा घटणार?

## केंद्र सरकारच्या नव्या इन्कम टॅक्स विधेयकात काय बदलणार?




**नवी दिल्ली । वृत्तसंस्था**

**१२ लाखांपर्यंतची टॅक्स फ्री मर्यादा घटणार असून केंद्र सरकारच्या नव्या इन्कम टॅक्स विधेयकात बदल केला जाण्याची शक्यता आहे. त्यामुळे नोकरदार वर्गाचे टेंशन वाढणार आहे.**

केंद्र सरकार देशातील करप्रणालीत आमूलाग्र बदल घडवण्यासाठी नवे आयकर विधेयक आणण्याच्या तयारीत आहे. केंद्रीय संसदीय कार्यमंत्री किरेन ▶▶ पान २ वर

### पूर्णपणे नव्याने तयार केले जाणार विधेयक

नवे आयकर विधेयक संसदीय निवड समितीच्या शिफारशींवर आधारित असेल. मागील आयकर विधेयक मागे घेतल्यानंतर या नव्या विधेयकाची घोषणा झाल्याचे रिजिजू यांनी ९ ऑगस्ट २०२५ रोजी सांगितले. नवे विधेयक पूर्णपणे नव्याने तयार केले जाणार असले, तरी मागील विधेयकावर केलेले काम वाया जाणार नाही. संसदीय निवड समितीने सुचवलेले आणि सरकारने मान्य केलेले बदल या नव्या विधेयकात समाविष्ट केले जातील, असेही ते म्हणाले.

# गेवराईत खरेदीसाठी आलेल्या महिलेवर गोळीबार



**गेवराई । प्रतिनिधी**

शहागडवरून गेवराईत खरेदीसाठी आलेल्या महिलेवर अज्ञात दोन ते तीन जणांनी गोळीबार केल्याची घटना काल सायंकाळी घडली आहे. यामध्ये महिला गंभीर जखमी झाली असून तिला काल रात्री उशिरा बीड जिल्हा रूग्णालयात दाखल करण्यात आले होते. मात्र गोळी छातीत घुसल्याने तिला पुढील उपचारासाठी छत्रपती संभाजीनगरला रेफर ▶▶ पान २ वर

# आष्टी तालुक्यात कोट्यावधीची फसवणूक; ११ जणाविरुद्ध गुन्हे दाखल

**आष्टी । प्रतिनिधी**

**अंभोरा परिसरासह आष्टी तालुक्यासह अनेक नागरिकांना इनफिनाईट बीकॉन या कपनिच्या नावाने १० टक्के परतावा मिळवून देण्याचे अमिष दाखवून लाखो रूपयाची गुंतवणूक करायला भाग पाडले मात्र गुंतवलेले पैसे न मिळाल्याने फसवणूक झाल्याचे लक्षात आल्यानंतर अनेकानी पोलिस ठाणे गाठले आष्टी तालुक्यात कोट्यावधीची फसवणुक झाल्याची आंदाज असून या प्रकरणी ११ जणाविरूध्द गुन्हे दाखल करण्यात आले आहे.**

इनफिनाईट बीकॉन फायनान्सियाल सर्विस प्रा.लि. कर्वे नगर पुणे या आर्थिक गुंतवणूक करणाऱ्यांना गुंतवणूकीवर दरमहा ०८ ते १० टक्के परतावा मिळवून देतो, असे अमीष दाखवुन व गुंतवणूक करण्याबाबतची सविस्तर माहीती



दिली. म्हणून फिर्यादी यांनी कंपनीमध्ये गुंतवणूक म्हणून रक्कम रुपये तीन लाख वीस हजार रुपये (३,२०,०००/–) आरोपीच्या असलेल्या नमुद सीससे व ट्रेडदा ईन्वेस्टमेंट प्रा. लि. या ब्रोकींग फर्म कंपनीच्या खात्यावर वर्ग केले. तसेच फिर्यादीच्या ओळखीच्या ५०० ते ६०० व्यक्तींची नमुद कंपनीमध्ये ▶▶ पान २ वर

# निवडणूक आयोगाची राहुल गांधींना नोटीस

**बंगलुरु । प्रतिनिधी**

**लोकसभा निवडणुकीत मतचोरीचा आरोप केल्याबद्दल काँग्रेस नेते राहुल गांधी यांना कर्नाटक राज्याचे मुख्य निवडणूक अधिकारी यांनी नोटीस बजावली आहे.**


लोकसभा निवडणुकीत मत चोरी केल्याचा आरोप काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी केला होता. त्यासंबंधी पुरावे देताना राहुल गांधींनी शकुन राणी या महिलेचा संदर्भ दिला होता. त्या शकुन राणीने दोन वेळा मतदान केल्याचा दावा राहुल गांधींनी केला. त्यावर आता निवडणूक आयोगाने राहुल गांधींना नोटीस बजावली आहे. या संबंधी सर्व पुरावे सादर करा असे निर्देश निवडणूक आयोगाने दिले आहेत.

राहुल गांधी यांनी नुकत्याच दिल्लीतील एका परिषदेत असा दावा केला होता की शकुन राणी नावाच्या महिला मतदाराने दोन वेळा मतदान केले. त्यांनी या संदर्भात काही दस्तऐवज दाखवले होते. मात्र, चौकशीत शकुन राणी यांनी हा आरोप फेटाळून लावत मी केवळ एकदाच मतदान केले असे स्पष्ट केले. त्यानंतर आता निवडणूक आयोगाने राहुल गांधी यांना नोटीस बजावली आहे.

# नैसर्गिक आपत्तीत सकारात्मक दृष्टीकोन गरजेचा–नरेंद्र मोदी

**नवी दिल्ली । वृत्तसंस्था**

**जेव्हा आपत्ती व्यवस्थापनाचा विषय येतो तेव्हा प्रतिक्रियात्मक दृष्टिकोनापेक्षा सकारात्मक दृष्टिकोन नेहमीच चांगला असतो. त्यामुळे देशात विविध ठिकाणी आपत्ती व्यवस्थापनासाठी पूर्वतयारी करण्यात आलेली आहे, असे आपत्ती व्यवस्थापनाबाबत बोलताना पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी म्हटले आहे.**




पंतप्रधान मोदी म्हणाले, भारत हा नैसर्गिक विविधतेने नटलेला देश आहे. भारताच्या भुगोलामुळे देशात भूकंप, पूर, चक्रीवादळ, दुष्काळ, त्सुनामी, भूस्खलन आणि औद्योगिक अपघातांसह विविध नैसर्गिक आणि मानवनिर्मित आपत्ती येत असतात. देशातील २७ हून अधिक राज्ये आणि केंद्रशासित प्रदेश आपत्तीप्रवण म्हणून ओळखले जातात. तसेच देशाच्या ५८ टक्के पेक्षा जास्त भूभागावर भूकंप येतो. त्यामुळे आपत्ती सज्जता हा पर्याय नाही तर एक गरज आहे, असे ते म्हणाले. आपत्ती व्यवस्थापनाबाबत बोलताना पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी म्हटले आहे की, जेव्हा आपत्ती व्यवस्थापनाचा विषय येतो तेव्हा प्रतिक्रियात्मक दृष्टिकोनापेक्षा सकारात्मक ▶▶ पान २ वर

# वैद्यनाथ बँक निवडणुक; पंकजाताई मुंडे यांनी कुटुंबीयांसह बजावला मतदानाचा हक्क

## लोकनेते गोपीनाथराव मुंडे जनसेवा पॅनलची बाजू भक्कम









**परळी वै.। प्रतिनिधी**

**राज्याच्या पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री ना. पंकजाताई मुंडे, माजी खासदार डॉ.प्रितमताई मुंडे व मातोश्री प्रज्ञाताई मुंडे यांनी आज परळीत वैद्यनाथ बँक निवडणुकीसाठी मतदानाचा हक्क बजावला. दरम्यान या निवडणुकीत लोकनेते गोपीनाथराव मुंडे जनसेवा पॅनलची बाजू भक्कम असून संपूर्ण पॅनलचा एकहाती विजय होण्याची शक्यता आहे.**

वैद्यनाथ अर्बन बँक संचालक मंडळाच्या एकूण १७ जागांसाठी ही निवडणूक झाली. तेरा जागांसाठी आज सर्वत्र मतदान शांततेत झाले. या निवडणुकीत ना. पंकजाताई मुंडे व आ. धनंजय मुंडे यांच्या नेतृत्वाखाली ▶▶ पान २ वर

# मुंडे पिता–पुत्राच्या पक्षप्रवेशावर पंकजा मुंडे म्हणाल्या त्यांनी बंडखोरी केली तेव्हाच संबंध संपला होता



**परळी । प्रतिनिधी**

वडवणी येथे काही दिवसापूर्वी आयोजित मेळाव्यात राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या हस्ते पंकजा मुंडे यांचे कट्टर समर्थक राजाभाऊ मुंडे व त्यांचा मुलगा बाबरी मुंडे यांनी जाहीर प्रवेश घेतला. या प्रवेशानंतर आज माध्यमांशी पाहिल्यादाच या विषयी बोलताना पंकजा मुंडे म्हणाल्या की, बाबरी मुंडे याने मागच्या विधानसभा निवडणुकीत बंड करून अपक्ष निवडणूक लढवली त्याच वेळेस त्यांचा आणि माझा संबंध संपला होता.आज वैद्यनाथ बैंक निवडणुकीत मतदानासाठी मंत्री पंकजा मुंडे आल्या होत्या त्यावेळी त्यांनी प्रतिक्रिया दिली.

पुढे बोलताना म्हणाल्या कि आम्ही आमच्या महायुतीचा धर्म सांभाळत ▶▶ पान २ वर

# पावसाने कांदा शेतातच सडला

**नाशिक । प्रतनिधी**

**'कांद्याला आज ना उद्या भाव येईल' या आशेवर अनेक शेतकऱ्यांनी शेतातच कांदा साठवला होता. मात्र सततच्या पावसाने तो कांदा आता सडला असून येणाऱ्या काळात कांद्याचे दर वाढण्याची शक्यता आहे.**

सध्या शेतकरी आपला कांदा मिळेल त्या भावात नाइलाजाने बाजारात विक्रीसाठी पाठवत आहेत. मात्र, हा भाव इतका कमी आहे की, खर्चाची भरपाईदेखील होत नाही. त्यामुळे अनेक शेतकरी आर्थिक अडचणीत सापडले आहेत. मागील वर्षाच्या तुलनेत यंदा कांद्याचे उत्पादन मोठ्या प्रमाणावर वाढले. मात्र, बाजारभाव घसरल्यामुळे काही शेतकऱ्यांनी तर कांदा रस्त्यावर किंवा शेतात टाकून दिला. त्यामुळे अनेकांनी ▶▶ पान २ वर

## थोडक्यात...

### छत्रपती संभाजीनगरवरून पुन्हा धावणार नवीन वंदे भारत ट्रेन

छ. संभाजीनगर–छत्रपती संभाजीनगरहुन धावणारी वंदे भारत ट्रेन आता नांदेडहुन धावत आहे, आणि त्यामुळे छत्रपती संभाजीनगरहुन मुंबईला जाणारे प्रवासी नाराज झाले होते. आता येत्या तीन ते चार महिन्यात पुन्हा एकदा वंदे भारत सुरू होणार असल्याची माहिती भाजपचे खासदार आणि माजी केंद्रीय मंत्री भागवत कराड यांनी दिली आहे.

### बिंदुसरा धरणाजवळ ट्रक पलटला

बीड– तालुक्यातील पाली परिसरातील बिंदूसरा धरणाजवळ रविवारी दुपारी धुळे–सोलापूर महामार्गावर पाऊस सुरू असताना चालकाचे गाडीवरील नियंत्रण सुटल्याने ट्रक पलटी झाला. यामध्ये चालक किरकोळ जखमी झाला असून ट्रकचे प्रचंड नुकसान झाले आहे. दरम्यान ट्रक मध्ये असलेल्या शिमला मिरचीचं देखील मोठं नुकसान झालं आहे. बिंदुसरा धरणाच्या अगदी जवळच हा अपघात झाला असुन सुदैवाने त्या ठिकाणी कोणीही पर्यटक किंवा इतर वाहने उभी नसल्याने मोठा अनर्थ टळला आहे.

### फडणवीसांकडून मराठा नेत्यांना संपवण्याचे काम–मनोज जरांगे

जालना–'मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे जाणून बुजून मराठा नेत्यांना संपवण्याचे काम करत आहेत. तर मराठा अधिकाऱ्यांना त्रास दिला जातोय. प्रशासनातील मराठा अधिकाऱ्यांना त्रास होत असेल तर त्यांच्या मागे खंबीरपणे उभा राहण्याचे आवाहन आहे' असे मनोज जरांगे पाटील यांनी म्हटले आहे.

### मंत्रालयात ऑफलाइन प्रवेश बंद

मुंबई–महाराष्ट्राच्या मंत्रालयात आता १५ ऑगस्टपासून प्रवेशासाठी प्रवेश ॲपवर नोंदणी करणं अनिवार्य करण्यात आले आहे. गृह विभागाच्या उपसचिवांनी दिलेल्या माहितीनुसार, आता ऑफलाइन प्रवेश बंद करण्यात आला आहे. डीजी स्कॅन प्रवेश प्रणाली सुरू होऊनही मंत्रालयाच्या प्रवेशद्वारावर ऑफलाइन पाससाठी मोठ्या रांगा लागत होत्या. त्यामुळे हा निर्णय घेण्यात आला आहे. ज्या नागरिकांकडे अँड्रॉइड मोबाईल नाही, त्यांच्यासाठी मंत्रालयाकडून पर्यायी व्यवस्था केली जाईल.

### पंढरपुरातील विठ्ठल मंदिरात हिंदीतून पूजा?

पंढरपुर–विठ्ठल–रुक्मिणी मंदिराच्या वतीने तुलसी अर्चन पूजाचे आयोजन करण्यात आले होते. यात सुरुवातीला मराठीत पूजा सांगण्यात येत होती. मात्र एका हिंदी भाषिक भाविकाच्या आग्रहामुळे हिंदीत पूजा सांगण्यात आली. असा आरोप राहुल सातपुते नावाच्या एका मराठी भाविकाने केला आहे.

### शरद पवार लवकरच केंद्रातील सत्तेत सहभागी होणार–रवी राणा

अमरावती : शरद पवार लवकच केंद्रातील सत्तेत सहभागी होतील असा खळबळजनक दावा आमदार रवी राणांनी केला आहे. शरद पवार हे मोदींचे नेतृत्त्व मान्य करतील असेही राणा म्हणाले आहेत.

### नववीसाठी आता ओपन बुक परीक्षा

पुणे–केंद्रीय माध्यमिक शिक्षण मंडळाने म्हणजेच ने नववीच्या विद्यार्थ्यांसाठी एक महत्त्वाचा निर्णय घेतला आहे. आता नववीच्या परीक्षा ओपन बुक पद्धतीने घेतल्या जाणार आहेत. या निर्णयानुसार, परीक्षेवेळी विद्यार्थ्यांना त्यांची पुस्तकं, नोट्स आणि संदर्भ ग्रंथ सोबत ठेवण्याची आणि त्यांचा वापर करण्याची परवानगी असेल.

### शिवसेनेचे आज राज्यभर जनआक्रोश आंदोलन

मुंबई : महायुती सरकारमधील भ्रष्ट मंत्र्यांच्या विविध कारनाम्यांमुळे देशात महाराष्ट्राची बदनामी होत आहे. राज्यातील जनतेला या भ्रष्टाचाराबाबत जागृत करण्यासाठी राज्यभरात शिवसेना सोमवारी आंदोलन करणार आहे. जिल्हाधिकारी कार्यालय आणि मुंबईतील सर्व विभागात हे आंदोलन करण्यात येणार आहे. मुंबईतील आंदोलनात उद्धव ठाकरे सहभागी होणार असल्याची माहिती आहे.

### रेल्वेच्या रिटर्न तिकिटावर मिळणार २० टक्के सूट

नवी दिल्ली : रेल्वेने आपल्या प्रवाशांसाठी एक खास योजना सुरू केली आहे. राउंड ट्रिप पॅकेज स्कीम असे या योजनेचे नाव असून, या अंतर्गत येण्या–जाण्याचा प्रवास एकत्र बुक केल्यास परतीच्या तिकिटावर २० टक्के सूट मिळणार आहे. सध्या ही योजना प्रायोगिक तत्त्वावर सुरू करण्यात येत आहे.

## बाजारभाव

**कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड, दि.०७ ऑगस्ट २०२५**

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहू: ७.०० क्विंटल | २,३४० | २,७४६ | २,५४३ |
| ज्वारी/हायब्रिड : ५६.०० क्विंटल | २,०५० | २,६०१ | २,३८७ |
| मका/लोकल:१.५० क्विंटल | २,१०४ | २,१०४ | २,१०४ |
| तूर : १३.५० क्विंटल | ६,३०० | ६,३०० | ६,३०० |
| उडीद : १.५० क्विंटल | ५,००० | ५,००० | ५,००० |
| बाजरी: ७.०० क्विंटल | २,४०१ | २,७३० | २,६०० |
| मुग: २.५० क्विंटल | ६,४११ | ६,९१० | ६,६६० |
| सोयाबीन: ४.५० क्विंटल | ४,१०० | ४,६११ | ४,३५५ |
| हरभरा: १०.०० क्विंटल | ४,९०० | ६,१०१ | ५,५४६ |

cmyk

अग्रलेख

# दुर्दैव ! अमेरिकेच्या खेळीवर भारताची मदार...

जुलै महिन्याच्या शेवटच्या आठवड्यात पाकिस्तानच्या लष्करप्रमुखांनी चीनचा दौरा केला. चीनला पाकिस्तानचा सर्वकालीन मित्र म्हणवणाऱ्या पाकिस्तानच्या लष्करप्रमुखांनी या दौऱ्यातही चीनची प्रशंसा केली. चीन आणि पाकिस्तान 'आयर्न ब्रदर्स' आहेत, असे पाकचे जनरल असीम मुनीर म्हणाले. त्याच सुमारास मुनीर यांचा अमेरिका दौराही झाला. अमेरिकेचे अध्यक्ष ट्रम्प यांनी मुनीर यांना भोजनासाठी बोलावले. त्यामुळे मुनीर चांगलेच भारावले. त्यांनी ट्रम्प यांचीही प्रशंसा केली. आता अशीही बातमी आहे की मुनीर पुन्हा एकदा अमेरिकेचा दौरा करणार आहेत. ट्रम्पही मुनीर यांच्या माध्यमातून भारताला डिवचण्यासाठी किंवा त्यांच्या कोणत्या अंतस्थ हेतूंसाठी पाकिस्तानला गोंजारताना दिसत आहेत. यातून बदलाचे संकेत मिळत आहेत. या बदलाचे परिणाम केवळ पाकिस्तानवरच होणार नाहीत, तर भारत आणि चीन यांच्यावरही त्याचा प्रभाव पडणार आहे. चीन आणि पाकिस्तान अगदी घट्ट मित्रासारखे बऱ्याच काळापासून एकत्र आहेत. त्यांच्या या मैत्रीची चर्चा आता आणि विशेषत: चीनने पाकिस्तानातील अनेक प्रकल्पांत मोठी गुंतवणूक केल्यापासून जास्त होऊ लागली असली तरी या मैत्रीचा इतिहास हा १९६० च्या दशकापासूनचा आहे. बाह्यत: चीन काहीही दाखवत असला अथवा भासवण्याचा प्रयत्न करत असला तरी त्यांनी पाकिस्तानला जवळ करण्याचे मुख्य कारण भारत हेच आहे. काश्मीरच्या मुद्द्यावर चीनने कायमच पाकिस्तानला पाठिंबा दिला. मोबदल्यात पाकने व्याप्त काश्मीरमधील एक भाग चीनला देऊन टाकला. एखाद्या घरावर अनधिकृत कब्जा करायचा आणि नंतर ते घर दुसऱ्याला देऊन टाकायचे अशा स्वरूपाचा हा प्रकार. तरीही चीनलाही त्यांच्या भविष्यकालीन व्यापार योजना आणि भारताला शह देण्यासाठी पाकची ही कृती पोषकच ठरली.

येणारा काळ हा आशिया खंडाचा असेल याबाबत सर्व अर्थ आणि रणनीतीविषयक तज्ज्ञांमध्ये एकमत आहे. भारत स्वतंत्र झाला तेव्हापासूनच आपल्या स्पर्धकाचे आगमन झाल्याची जाण चीनला होती. भारताला सतत कशाततरी किंबहुना कुरापतींमध्ये गुंतवून ठेवेल अशा सहकाऱ्याची चीनला गरज होती. ती पाकिस्तानने पूर्ण केली. अमेरिकेसोबतही पाकची प्रदीर्घ काळ जवळीक होती. मात्र, अमेरिका लांब आणि पाकिस्तानच्या प्रत्येक गोष्टीला मम म्हणणारा नसल्यामुळे, अफगाणिस्तानातील त्याचे स्वारस्य संपल्यामुळे पाकची अडचण झाली. चीनच्या अधिक जवळ जाण्यात त्यांना वेळ लागला नाही. चीनला मोठी भेट देऊन पाकिस्तानने त्यांच्या गुडबुकमध्ये राहण्याचा प्रयत्न केला असला, तरी भविष्यातील स्वत:शीच संघर्षाची बीजेही रोपण करून ठेवली आहेत.

त्याचे कारण चीनबरोबर त्यांनी कोणतीही सीमारेषा निर्धारित केलेली नाही. एकप्रकारे रणनीतिक स्वरूपाचा समझोता करून भारतावर वचक ठेवला, जे चीनलाही हवे होते आणि त्यात त्यांना स्वत:ला गमावण्यासारखे काही नव्हते. हा झाला एक भाग, मात्र आता पाकिस्तानच्या कथित लोकनियुक्त सरकारच्या प्रतिनिधींना दुर्लक्षित करून त्या देशाच्या लष्करी नेतृत्वाशी अमेरिकेच्या भेटीगाठी सुरू झाल्या आहेत त्यातून दक्षिण आशियातील समीकरणे बदलतील. या घडामोडींकडे भारताला काळजीपूर्वक पाहावे लागणारच आहे. व्यापार करारावरून डोनाल्ड ट्रम्पच्या दबावाला भारताने भीक घातलेली नाही. त्यातून अमेरिका भविष्यात त्यांच्या दृष्टीनेही गैरसोयीच्या ठरणार आहेत अशा गोष्टी करत आहे.

अमेरिकेचे एक कमांडर मायकेल कुरिला यांच्या निरोप समारंभाचे निमित्त पाकिस्तानच्या लष्करप्रमुखांच्या नियोजित अमेरिका भेटीचे कारण आहे. या कुरिलांनीच काही आठवड्यांपूर्वी दहशतवादाच्या विरोधातील उत्तम कामगिरीसाठी पाकची मुक्तकंठाने प्रशंसा केली आहे. त्या गरम तव्यावर पोळी भाजून घेण्याचा मुनीर यांचा प्रयत्न दिसतो. चीन-पाकिस्तान इकॉनॉमिक कॉरिडॉर अंतर्गत मोठी गुंतवणूक असल्यामुळे चीन सहजी पाकला सोडणार नाही. पाकिस्तानात चीनचे अनेक तंत्रज्ञ आणि कामगार काम करत आहेत. सामाईक शत्रू भारताचा विरोध करतानाच या दोन देशांत कुरबुरीही झाल्या आहेत. चिनी नागरिकांवर पाकिस्तानात हल्ल्याच्या घटना घडत असतात. त्या ज्या प्रकारे हाताळल्या जात आहेत त्यावरून आणि आपल्या लोकांना संरक्षण देण्यात पाक अपयशी ठरत आहे यावरून चीनने वेळोवेळी उघड नाराजी पाककडे वर्तवली आहे.

एवढेच नव्हे, तर आमच्या लोकांच्या रक्षणासाठी आमचेच सैनिक पाकिस्तानात असतील असा अंतिम आणि निर्वाणीचा प्रस्तावही त्यांनी पाकला दिला आहे. असे असताना पाकिस्तान काही तिरक्या चालीने चालतोय का याची कुणकुण चीनला लागली असेल तर ते अधिक दक्ष राहतील. त्यातूनच चीनच्या मोबदल्यात पाकिस्तान अमेरिकेशी नवीन संबंध निर्माण करणार नसल्याचे सूचक विधान चीनकडून केले गेले आहे. आता या दोन्ही देशांत खरेच कटुता येणार किंवा संबंध फारसे घनिष्ठ राहतील की नाही हा जर तरचा विषय झाला. तथापि, असे जर झालेच तर कूटनीतीच्या दृष्टीने भारताला त्याचा निश्चितच लाभ होईल. सीमेवर भारताला एकाचवेळी दोन बाजूंना लक्ष ठेवावे लागते आहे.

स्थिती बदलली तर भारताचा यातील काही वेळ आणि बराच खर्च वाचेल आणि तो इतर कामांकडे वळवता येऊ शकतो. अमेरिकेच्या आकर्षणात पाकिस्तानने चीनशी असलेले संबंध पूर्णपणेच बिघडवले तर स्वाभाविकपणे चीनकडून त्यांचा निधी रोखला जाईल आणि आर्थिक संकटात असणारा पाकिस्तान आणखी दुबळा होईल हे वेगळे सांगायला नको. अमेरिकेकडून पीडित असलेल्या चीनलाही भारताशी संबंधांत सुधारणा करायची आहे असे म्हटले जाते.

मात्र याकडेही दुर्लक्ष करता येणार नाही की भारताच्या अनेक संवेदनशील मुद्द्यांवर चीनची भूमिका अत्यंत संवेदनाहीन राहिली आहे. आपल्या लक्ष्यांच्या पूर्ततेसाठी त्यांना भारत जवळ हवा असू शकतो. मात्र, भारताच्या हिताच्या विरोधात जाण्याची आपली वृत्तीही तो देश सोडणार नाही. जगात वेगाने घडत असलेल्या घडामोडींत आशिया केंद्रस्थानी येतो आहे. अमेरिकेच्या पुढच्या खेळीवर मोठे बदल होणार आहेत.

## राजे शिवाजी गणेश मंडळाची कार्यकारणी जाहीर

**माजलगाव । प्रतिनिधी**

येथील नामांकित गणेश मंडळापैकी एक असलेला राजेशिवाजी गणेश मंडळ जिजामाता नगर माजलगाव या मंडळाला गेल्या काही वर्षात आमदार गणराया प्रथम क्रमांक ,पोलीस प्रशासनाकडून दिला जाणारा प्रथम पुरस्कार,रोटरी क्लब देण्यात येणारा प्रथम पुरस्कार, आतापर्यंत तीन वेळेस २०२१,२२,२०२३ वर्षाचे चे आमदार प्रथम पारितोषिक मिळवणारा एकमेव गणेश मंडळ तसेच मंडळाच्या वतीने विविध अशा सामाजिक कार्याने हा गणेशोत्सव साजरा केला जातो यामध्ये,रक्तदान, आरोग्य शिबिर, वृक्षारोपण,गणेश विसर्जन दिवशी भव्य अशी टिपरी नृत्य असे विविध सांस्कृतिक कार्यक्रम घेतले जातात दिनांक ०६ ऑगस्ट रोजी मंडळाची कार्यकारणी जाहीर झाली त्यानुसार सल्लागार पदी सुरेश भाऊ शेटे, मदन नाना पांढरे, महादेव भैय्या शिरसट व अमोल गिरी, अध्यक्षपदी आसाराम चोरघडे, उपाध्यक्ष सुरज एंखडे,सचिव विकास पाटील, नितीन चोरघडे, कोषाध्यक्ष अमोल ढवण,संतोष खेत्री, स्पर्धा प्रमुख पदी अजय चोरघडे,गजानन जोशी, लखन धरपडे,अभिषेक गायकवाड,रोहित लांडगे, विजय चोरघडे. टिपरी,नृत्य प्रमुख प्रवीण कुलकर्णी, गणेश तोडकरी, नियोजन समिती गोरख शिंदे, भानुदास सोळंके,विलास कदम,रमेश सुरवसे, सचिन राऊत,महेश शेटे, दिनेश गिरी,बंटी राऊत, दशरथ चोरघडे, दीपक तोडकरी,मुकेश काळे,दुर्गादास देशमुख,संतोष शिंदे,राजेभाऊ काळे,राजेभाऊ शिंदे,लखन नायबळ,महेश स्वामी,महादेव एखंडे, बालासाहेब नाटकर,लखन नायबळ, विनायक जमदाडे,गणेश निकम,नामदेव चोरघडे,ऋषिकेश कुलकर्णी,भाऊ टोम्पे,डॉ संतोष गायकवाड,गुरुदत्त गिरी ,गोविंद केसापुरे,गणेश शिरसाट,सदस्य पदी विशाल माने, शिव निर्मल,ओमकार गिरी,रितेश शेटे, रुपेश लांडगे, विशाल केसापुरे,शिवा एखंडे,आशुतोष शर्मा,श्रीकांत शिंदे,प्रशांत शेलार, सुचंद्र स्वामी,राजेश लांडगे,शुभम यादव,मनोहर काशीद,सुनील एखंडे,भारत ढगे,दत्ता शेजुळ,संतोष चोरघडे,शिवा एखंडे,सुनील केसापुरे,प्रशांत स्वामी,अथर्व जोशी,शुभम स्वामी,सचिन मोहिते,सुरज साडेगावकर,विनोद देशमुख,कृष्णा मालपाणी,राजेश वैरट,सुमित भांडवलकर ,दत्ता शिरसाठ,सुमित घेणे,शंकर वटाणे, तुषार शिंदे,गोविंद सोळंके,अशोक लोकरे वरील सर्व सदस्यांची निवड झाली असून सर्व पदाधिकाऱ्यांचे सत्कार करण्यात आला व पुढील वाटचालीस शुभेच्छा देण्यात आल्या.

## महसूल मंत्री बावनकुळे यांच्या हस्ते अंबडमध्ये १० महिला बचत गटांना १ कोटीच्या धनादेशाचे वाटप



**अंबड । प्रतिनिधी**

महसूल सप्ताहाच्या समारोपप्रसंगी अंबड येथे आले असता अंबड शहरातील १० महिला बचत गटांना महसुलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या हस्ते १ कोटीच्या धनादेशाचे वाटप करण्यात आले. मत्स्योदरी देवीच्या अहिल्यादेवी होळकर सभागृहात हा कार्यक्रम पार पडला. यावेळी बोलताना ना. बावनकुळे यांनी बचत गटातील महिलांनी या कर्जाचा उपयोग आपल्या व्यवसाय वाढीसाठी करण्याचे आवाहन केले. मिळालेल्या या रकमेतून आपण छोटे छोटे उद्योग उभारून गटाचा म्हणजेच आपला विकास आणि प्रगती साधावी, असेही ते म्हणाले यावेळी आमदार नारायण कुचे, छत्रपती संभाजी नगरचे विभागीय आयुक्त जितेंद्र पापळकर, जिल्हाधिकारी आशिमा मित्तल, जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मित्रू पी. एम., जिल्हा पोलीस अधिक्षक अजयकुमार बन्सल, अपर जिल्हाधिकारी रिता मैत्रेवार, निवासी उपजिल्हाधिकारी गणेश महाडिक, अंबडचे उपविभागीय अधिकारी उमाकांत पारधी, तहसिलदार विजय चव्हाण, अंबड नगर परिषदेचे मुख्याधिकारी मनोज उकिर्डे, शरद मगर, नगर परिषद सहायक प्रकल्प अधिकारी संजीव मैंद यांच्यासह महिला बचत गटांच्या सदस्यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

## कै.दत्तासाहेब देशमुख विद्यालयात रक्षाबंधन व क्रांती दिन साजरा

**अंबड । प्रतिनिधी**

**कै.दत्ता साहेब देशमुख माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय,घनसावंगी येथे विविध कार्यक्रम संपन्न झाले. यामध्ये ऑगस्ट क्रांती दिन, आदिवासी दिन, रक्षाबंधन कार्यक्रम आणि शाळेतील विविध स्पर्धेत पहिले आलेल्या विद्यार्थ्यांचा सत्कार असे विविध कार्यक्रम साजरे करण्यात आले.**



यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून शाळेतील ज्येष्ठ शिक्षक श्री राजेंद्र मोरे, अध्यक्ष म्हणून प्रा लक्ष्मण गोरे सर उपस्थित होते, शाळेचे मुख्याध्यापक श्री केशव अटकर यांनी यावेळी शाळेतील यशस्वी विद्यार्थी आणि प्रशिक्षक शिक्षिका श्रीमती हिरा टेकाळे यांचा सत्कार केला, यावेळी मुख्याध्यापक श्री केशव अटकर यांनी आदिवासी बांधवांच्या देशाच्या जडण घडणीतीतील महत्वाचा सहभाग, स्वातंत्र्य संग्रामातील त्यांचे योगदान याच सोबत ऑगस्ट क्रांती दिनाच्या निमित्याने स्वातंत्र चळवळीतील राष्ट्रीय सभा आणि त्यांच्या प्रमुख नेत्यांचे योगदान याची माहिती विद्यार्थी आणि उपस्थिताना दिली, आपण आपल्या परंपरा जपण्यासाठी सण - उत्सव साजरे करीत असतो,आपल्या पूर्वजांनी ज्या पद्धतीने परंपरा जपल्या त्याची माहिती आपणही पुढच्या पिढीला देण्याचे काम केले पाहिजे असेही श्री अटकर यांनी नमूद केले, कार्यक्रमास यावेळी नियाज अहमद हे पालक प्रतिनिधी उपस्थित होते, यावेळी शाळेतील शिक्षक सर्वश्री कांता खोजे सर,संभाजी शिंदे सर , जे बी जाधव सर , सय्यद सर, प्रा धाइत मॅडम , श्रीमती वाघमारे मॅडम, विष्णू गणकवार सर, संतोष सर,विनोद गवळी सर, मोताले सर,बजरंग मोरे सर, तोडकर सर, कांगणे मॅडम, एस बी पठाण मॅडम, एस एफ पठाण, शंकर राठोड सर, सोमवारे सर,लोंढे सर, रेचोडे सर, गीतराम शिंदे सर,अरुण राऊत सर,सपकाळ मॅडम , संतोष घायाळ सर,भुतेकर सर, वाघुंडे सर,राजाराम काळे,अरुण नाटकर, नागनाथ गोंदगिरे, विजय लोंढे,पाराजी जवळकर,रावसाहेब साळवे, कृष्णा भापकर कार्यक्रमाचे सूत्र संचालन श्रीमती हिरा टेकाळे यांनी केले तर आभार प्रदर्शन प्रा.राजेंद्र सानप सर यांनी केले.

## कळंब येथे ज्येष्ठ नागरिक महासंघाकडून भटक्या समाजासोबत रक्षाबंधन साजरा

**कळंब। प्रतिनिधी**

**भाऊबहिणीच्या स्नेहबंधाचे प्रतीक असलेला रक्षाबंधन सण यंदा कळंब येथे एक आगळ्यावेगळ्या पद्धतीने साजरा करण्यात आला. ज्येष्ठ नागरिक महासंघाच्या वतीने रेणुका नर्सिंग स्कूलसमोरील भागात पाल टाकून राहणाऱ्या भटक्या समाजातील कुटुंबांसोबत रक्षाबंधनाचा कार्यक्रम पार पडला.**



या निमित्ताने भटक्या समाजातील चिमुकल्या मुलींना नवीन कपड्यांचे वाटप करण्यात आले. कार्यक्रमाची सुरुवात चिमुकला संघर्ष घोडके याला राखी बांधून झाली. त्यानंतर मुलींनी ज्येष्ठ नागरिक व सामाजिक कार्यकर्त्यांना राख्या बांधल्या. या उपक्रमाचे आयोजन ज्येष्ठ नागरिक महासंघाचे धाराशिव जिल्हाध्यक्ष महादेव महाराज आडसूळ यांनी केले. कार्यक्रमाला ॲड. त्रिंबकराव मनगिरे, भाजप शहराध्यक्ष मकरंद पाटील, प्रकाश भडंगे, परशुराम देशमाने, जिल्हा मुख्याध्यापक संघाचे अध्यक्ष सुरेश टेकाळे, मुख्याध्यापक राजेंद्र बिक्कड, संपादक सुभाष घोडके, संदीप कोकाटे, सामाजिक कार्यकर्ते बंडू आबा ताटे आदी उपस्थित होते. माधवसिंग राजपूत यांनी सूत्रसंचालन केले. ज्येष्ठ नागरिक महासंघाचा हा उपक्रम भटक्या समाजाशी स्नेहाचे बंध दृढ करणारा आणि प्रेरणादायी ठरला.

## लोकमान्य टिळक विद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी दिला सामाजिक समरसता व वृक्षसंवर्धनाचा संदेश

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

**तालुक्यातील पोखरीच्या लोकमान्य टिळक विद्यालयातील विद्यार्थ्यांनी विस्तार सेवा कार्य विभाग आणि संस्कार मंडळाच्या वतीने क्रांतिदिन,रक्षाबंधन,नारळी पौर्णिमा व संस्कृत दिन शाळेत संपन्न झाला. गावातील ज्येष्ठ नागरिक,माजी विद्यार्थी,आजी-माजी सरपंच,ग्रामपंचायत सदस्य, विविध जाती जमाती धर्म पंथातील ग्रामस्थ,आरोग्य सेवक,ऑटोरिक्षा चालक तसेच जि.प.प्राथमिक शिक्षक कर्मचारी गण इ.घटकांना प्रत्यक्ष भेटून आणि घरोघरी स्वतः लावलेल्या वृक्षांना राखी बांधून सामाजिक समरसता व वृक्ष संवर्धनाचा संदेश दिला. कार्यक्रमाच्या सुरुवातीला मुख्याध्यापक अरुण पत्की यांच्या हस्ते भारत माता व नेताजी सुभाषचंद्र बोस यांच्या प्रतिमेचे पूजन करून अभिवादन करण्यात आले.**

याप्रसंगी कु.अस्मिता निकम,प्रगती निकम,नंदिनी शिंदे,अनुजा निकम,प्रिया बळवंत,अंतरा कल्याणी,अक्षरा नेवल या मुलींनी वेशभूषेत झाशीची राणी,राजमाता जिजाऊ,सावित्रीबाई फुले यांच्या सह स्वातंत्र्य संग्रामातील क्रांतिकारक वासुदेव बळवंत फडके,लाला लजपतराय, चंद्रशेखर आझाद,मंगल पांडे यांचे स्वातंत्र्य संग्रामातील व सामाजिक कार्य यांची माहिती दिली. मुख्याध्यापक अरुण पत्की यांनी विद्यार्थ्यांना रक्षा बंधन,नारळी पौर्णिमा व संस्कृत दिन याचे पौराणिक तथा ऐतिहासिक महत्त्व विस्तृतपणे सांगितले.तसेच स्वातंत्र्य लढ्यात सहभाग घेणाऱ्या क्रांतिकरांच्या शौर्याची यशोगाथा आपल्या मनोगतामधून सांगितली. विस्तार सेवा प्रमुख राकेश मोरे यांनी विद्यार्थ्यांना विविध उदाहरणातून सामाजिक समरसता याविषयी माहिती सांगत विद्यार्थ्यांनी वृक्ष संवर्धन चळवळीचा गावभागात सर्वदूर प्रचार आणि प्रसार करावा असे आवाहन केले.कार्यक्रमाचे प्रास्ताविक नितीन चौधरी, संचालन करून आभार पल्लवी कुलकर्णी यांनी मानले.सदरील उपक्रमात इ.८वी ते १०वीतील विद्यार्थी,सर्व शिक्षक,कर्मचारी यांनी उत्साहात सहभाग घेतला.

## वसंत हंकारे यांचं मंगळवारी अंबडमध्ये व्याख्यान

**अंबड । प्रतिनिधी**

**प्रसिद्ध व्याख्याते श्री वसंत हंकारे सर यांचे मंगळवारी १२ ऑगस्ट रोजी व्याख्याने आयोजन करण्यात आले आहे. सदरील व्याख्यान खा. डॉ. कल्याण काळे यांच्या संकल्पनेतून व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले.**

आपल्या व्याख्यानाच्या माध्यमातून सर्वांना खळखळून हसविणारे आणि रडविणारे महाराष्ट्रातील प्रसिध्द व्याख्याते श्री वसंत हंकारे सर हे अंबड नगरीत प्रथमच येत असून त्यांच्या व्याख्यानाचा कार्यक्रम मंगळवार दि. १२ ऑगस्ट २०२५ रोजी सकाळी १०.३० वाजता मत्सोदरी महाविद्यालय या ठिकाणी होत आहे. खा. डॉ. कल्याण काळे यांच्या संकल्पनेतून हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. या व्याख्यानाला प्रमुख उपस्थिती म्हणून माजी राज्य मंत्री राजेश टोपे हे राहणार आहे. स्व. वैजिनाथराव काळे स्मृती प्रतिष्ठाण द्वारा या व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले आहे. आई-वडील, मुलं-मुली यांच्या नात्यातील सुंदर व्याख्या सांगणारे प्रभावी व्याख्याते वसंत हंकारे यांचे काळजाला भिडणारे व्याख्यान अंबडकरांसाठी आयोजित करण्यात आले आहे. आई-बाप समजून घेतांना आजच्या तरुण पिढीला व विद्यार्थ्यांना योग्य दिशा दाखविणारे हे व्याख्यान आहे. त्यामुळे या व्याख्यानाला अंबड येथील नागरीकांनी उपस्थित रहावे असे आवाहन स्व. वैजिनाथराव काळे स्मृती प्रतिष्ठाण चे अध्यक्ष खा. डॉ. कल्याणराव काळे, सचिव भाऊसाहेब बापू काळे यांच्या वतीने करण्यात आले आहे.

## पान १ वरून...

### मराठवाड्यातील नद्यांवरील

आठही जिल्ह्यांतील ८७९ प्रकल्पातील उपयुक्त पाणीसाठा ६६.२३ टक्क्यांवर पोहोचला आहे. अजूनही मध्यम व लघू प्रकल्पातील पाणीसाठा अजूनही निम्म्यावर पोहोचला नसल्याची स्थिती आहे. मराठवाड्यातील मोठ्या ११ प्रकल्पांत आत्ताच्या घडीला ७९.०५ टक्के उपयुक्त पाणीसाठा झाला आहे. गोदावरी नदीवरील १५ बंधाऱ्यांत ६४.१८ टक्के उपयुक्त पाणीसाठा झाला असून तेरणा, मांजरा, रेना नद्यांवरील २७ बंधाऱ्यांत ५२.०५ टक्के उपयुक्त पाणीसाठा झाला आहे. मध्यम ७५ प्रकल्पांत ४२.९१ टक्के उपयुक्त पाणीसाठा झाला असून, लघू ७५१ प्रकल्पांत ४०.३४ टक्के उपयुक्त पाणीसाठा झाला असल्याची माहिती जलसंपदा विभागाकडून देण्यात आली.

----------

### १२ लाखांपर्यंतची टॅक्स

रिजिजू यांनी दिलेल्या माहितीनुसार, वित्तमंत्री निर्मला सीतारमण सोमवारी म्हणजेच ११ ऑगस्ट २०२५ रोजी लोकसभेत हे विधेयक मांडणार आहेत. या विधेयकाद्वारे करसवलतीच्या मर्यादेत बदल होण्याची शक्यता आहे. विशेषत: १२ लाखांपर्यंतच्या करमुक्त उत्पन्नाच्या मर्यादेत कपात होऊ शकते, अशी चर्चा सध्या सुरू आहे.

-------------

### खोक्याला जामीन मंजूर,

पोलीस ठाण्यांमध्ये गुन्हे दाखल असून वन विभागाच्या जागेवर दुमजली इमारत आणि त्या बाजूला आलिशान ऑफिस मधून सतीश भोसले त्याचा कारभार चालवत असल्याचं समोर आलं होतं .त्यानंतर वन विभागाने त्याच्या घरावर ऑफिसवर बुलडोझर चालवल्यानंतर त्याची न्यायालयीन कोठडीत रवानगी झाली होती . काही महिन्यांपूर्वी सतीश भोसले च्या घरावर वनविभागाने कारवाई केली होती. त्यानंतर त्याच्या घरात शिकारीचे साहित्य तसेच वन्यजीवांचे मास आढळून आले होते. सतीश भोसले उर्फ खोक्या हा शिरूर कासार तालुक्यातील झापेवाडीचा रहिवासी आहे . काही महिन्यांपूर्वी समाज माध्यमांवर दहशत पसरवणारे त्याचे व्हिडिओ व्हायरल झाले होते .वनविभागाची कारवाई व घरात सापडलेल्या ऐवजामुळे बीडमध्ये व राज्यभर खोक्याची एकच चर्चा झाली होती.

-----------

### आष्टी तालुक्यात कोट्यावधीची

गुंतवणुक केली. मार्च २०२५ पासून कंपणीचे फिर्यादी व इतर व्यतीना दरम्हा देव असलेले परतावा बंद केला. त्यामुळे त्यांनी कंपणीकडे त्यांचे पैसे मागितले असता कंपीने उडवाउडवीचे उत्तरे दिली व गुंतवणकदारांचे पैसे परत दिले नाही. त्यामुळे फिर्यादी व इतर गुंतवणकदार यांना त्यांची फसवणुक झाल्याची खात्री झाल्याने रोहिदास पोपट काळे, वय ४६ वर्षे, व्यक्साय शेती, व. पारोडी ता. आष्टी जि. बीड याच्या फिर्यादीवरून अंभोरा पोलिस ठाण्यात आरोपी अगस्त मिश्रा, राहूल काळोखे, संचालक,गौरव सुखदेवे, डेजीग्रेटेड डायरेक्टर, प्रसाद कुलकर्णी, डेजीग्रेटेड डायरेक्टर, सचिन खडतरे, डेजीग्रेटेड डायरेक्टर, चेतन घर, डेजीवेटेड डायरेक्टर, ययात मिश्रा, डेजीग्रेटेड डायरेक्टर व नवनाथ जगन्नाथ अवताडे, शुभम नवनाथ अवताडे, सुवर्णा नवनाथ अवताडे, ओंकार भुसारे याच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.पुढील तपास सपोनि साळवे करीत आहेत. दरम्यान या कंपनीने गुंतवणूकीवर ८ ते १० टक्के परतावा देण्याचे आमिष दाखवून आष्टी तालुक्यातील शेकडो लोकांना कोट्यावधी रूपयांना फसवल्याचे सांगण्यात येते.

-------------

### गेवराईत खरेदीसाठी आलेल्या

करण्यात आले आहे. जिल्हा रूग्णालयातील एक्सरेमध्ये महिलेच्या छातीत गोळी दिसुन आल्याने पिस्तुलने गोळी झाडली गेली हे स्पष्ट आहे. मात्र गोळीबाराचे नेमके कारण काय ? आणि घटना कोठे घडली ? हे दुपारी उशिरापर्यंत समजु शकले नाही. सदर महिलेसोबत असलेल्या दुसऱ्या एका तरूणीने गेवराईमध्येच हा प्रकार घडल्याचा दावा केला आहे. या प्रकरणात दुपारी उशिरापर्यंत गेवराई पोलीस ठाण्यात नोंद झालेली नव्हती. शहागड येथील खामगाव (ता.अंबड) परिसरातील शितल कटमिल्ला पवार (वय ३०) ही महिला तिच्या मैत्रीणीसह काल सायंकाळी गेवराईला खरेदीसाठी आली होती. गेवराईत आल्यानंतर तोंडाला बांधलेल्या दोन ते तीन जणांनी या दोघींना मारहाण करायला सुरूवात केली. मारहाणीपासून बचाव करण्यासाठी दोघी दोन दिशेने पळाल्या. मात्र शितल पवार या महिलेला छातीत गोळी लागल्याचे समोर आले आहे. तिला काल रात्री १२ वाजण्याच्या सुमारास गंभीर जखमी अवस्थेया ठिकाणी प्राथमिक उपचार करून एक्सरे काढण्या आला. एक्सरेमध्ये छातीत गोळी दिसुन येत आहे. सदर महिलेच्या हाता-पायावर देखील जखमा आहेत. दरम्यान शितल पवार यांच्यासोबत असलेल्या त्यांच्या मैत्रीणीने हा गोळीबार गेवराईमध्ये झाल्याचा दावा केला आहे.

----------

### नैसर्गिक आपत्तीत सकारात्मक

दृष्टिकोन नेहमीच चांगला असतो. त्यामुळे देशात विविध ठिकाणी आपत्ती व्यवस्थापनासाठी पूर्वतयारी करण्यात आलेली आहे, असे म्हटले आहे.

---------------

### पावसाने कांदा शेतातच

पुढील वर्षी कांद्याची लागवड न करण्याचा निर्णय घेतला आहे. एवढे कष्ट घेऊनही मिळणार काही नाही, मग शेतकऱ्यांनी करायचे तरी काय? असा प्रश्न उपस्थित झाला आहे.

-----------

### मुंडेंपिता पुत्राच्यापक्षप्रवेशावर पंकजा मुंडे म्हणाल्या

आहोत. माजलगाव मतदार संघाचे आमचे उमेदवार प्रकाश सोळंके यांचा प्रचार केला त्याचा विजय झाला आणि आज ते त्यांच्या सोबत गेले आहेत. म्हणजे ते आमच्या महायुतीत आले आहेत. त्यामुळे मला काही धक्का वगैरे बसला असे काही नाही, असे बोलताना पंकजा मुंडे यांनी म्हंटले आहे. आमदार प्रकाश सोळंके यांच्या नेतृत्वात पक्षांतर करण्याचा निर्णय घेतला आणि या वरून देखील राजाभाऊ मुंडे आणि मुलगा बाबरी मुंडे यांच्या प्रवेशावरून देखील अनेक राजकीय चर्चांना उधाण आल्याचे पाहवयास मिळाले होते. दरम्यान, अजित पवार यांचे स्वागत बॅनरने सबंध वडवणी शहर नटवण्यात आले होते. त्या लावण्यात आलेल्या बॅनरवर माजी मंत्री तथा आमदार धनंजय मुंडे यांचे फोटो लाण्याचे लावण्याचे टाळण्यात आले असल्याचे दिसून आले होते. आणि यावरून देखील राजकीय वर्तुळात चर्चेला उधाण आले होते.

---------------

### वैद्यनाथ बँक निवडणुक; पंकजाताई मुंडे

लोकनेते गोपीनाथराव मुंडे जनसेवा पॅनल रिंगणात उतरले आहे. या पॅनलच्या चार जागा या अगोदरच बिनविरोध निवडून आल्या आहेत. माजी खासदार डॉ.प्रीतमताई मुंडे यांचा बिनविरोध निवडून आलेल्या उमेदवारात समावेश आहे. आज दुपारी शहरातील लक्ष्मीबाई देशमुख महिला महाविद्यालयाच्या मतदान केंद्रावर जाऊन ना. पंकजाताई मुंडे, डॉ.प्रीतमताई मुंडे व प्रज्ञाताई मुंडे यांनी आपला मतदानाचा हक्क बजावला. या निवडणुकीत लोकनेते गोपीनाथराव मुंडे जनसेवा पॅनलची बाजू भक्कम असून येत्या १२ तारखेला मतमोजणीनंतर पॅनलचे सर्वच्या सर्व उमेदवार बहुमतांनी विजयी होतील असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

cmyk

# राज्य लोकतंत्र

नवी दिशा... नवे विचार.....

सोमवार दि. ११ ऑगस्ट २०२५




## थोडक्यात....

### आराधना महोत्सवाचे आयोजन

अंबाजोगाई । प्रतिनिधी

श्री श्री १००८ श्री सत्यात्मतीर्थ स्वामी महाराजांच्या आज्ञा व अनुग्रहाने श्री अनंत श्री भक्तकामकल्पद्रुम श्री राघवेंद्र तीर्थ श्रीपादांचा



३५४ वा आराधना महोत्सव दि. १०,११,१२ ऑगस्ट २०२५ (रविवार, सोमवार व मंगळवार) या तीन दिवसीय साजरा करण्याचे आयोजन केले आहे. रविवार, दि.१० ऑगस्ट २०२५ स. ६:०० ते ११:०० : प्रातः संकल्पगद्य, निर्माल्य विसर्जन, पंचामृत अभिषेक, अष्टोत्तर पारायण व पूजा स. ११:०० ते १२:०० : ज्ञानसत्र : पं. गोपीनाथाचार्य तुळजापूरकर (प्रवचन) दु. १२:०० वा. : महामंगलारती दु. ४:०० ते ५:०० : सेवा भजनी मंडळ, खडकपूरा भजन सेवा दु. ५:०० ते ७:०० :

ह.भ.प. अंबादास महाराज चिक्षे यांचे किर्तन

सायं. ७:०० ते ८:०० भजन, पालवी, आरती, पाळणा दि. ११ ऑगस्ट स. ६:०० ते ११:०० : प्रातः संकल्पगद्य, निर्माल्य विसर्जन, पंचामृत अभिषेक, अष्टोत्तर पारायण व पूजा दु. १२:०० वा. वै. पं. वामनाचार्य जोशी स्मृती पुरस्कार राष्ट्रपती पुरस्कार विजेते वे.शा.सं.सूर्यकांत देविदासबुवा लिंबेकर यांना प्रदान करण्यात येणार असून रा.ज.संदीकर स्मृती पुरस्कार शिवाजी राघवेंद्र देशपांडे यांना प्रदान केला जाणार आहे. दु. १२:३० वा.महामंगलारती दु. १:०० ते ३:०० : महाप्रसाद भजन, पालखी, आरती, पाळणा सायं. ६:०० ते ८:०० मंगळवार, दि. १२ ऑगस्ट २०२५ स. ६:०० ते ११:००: प्रातः संकल्पगद्य, निर्माल्य विसर्जन, पंचामृत अभिषेक, अष्टोत्तर पारायण व पूजा स. ११:०० ते १२:०० : ज्ञानसत्र दु. १२:०० वा. महामंगलारती दु. ५:०० ते ७:०० ह.भ.प.श्री श्रीरामबुवा प्र. रामदासी (बिटरगांवकर) यांचे किर्तन सायं. ६:०० ते ८:०० भजन, पालखी, आरती, पाळणा आदी धार्मिक कार्यक्रम शहराच्या अनुराग वसाहतीतील उत्तरादि मठ येथे होणार असून या सर्व धार्मिक कार्यक्रमास उपस्थित राहण्याचे आवाहन मिलिंद कऱ्हाडे,भक्त मंडळ उत्तरादि मठ, राघवेंद्र स्वामी सेवा मंडळ यांनी केले आहे.

### राज्यस्तरीय स्पर्धा परीक्षेत कै.दादाराव कराड विद्यालयाचे यश

अंबाजोगाई । प्रतिनिधी



माईर एम.आय.टी.पुणे संचालित कै.दादाराव कराड विद्यालयाने सेमी-इंग्रजी माध्यम एम.टी.एस.ओलंपियाड राज्यस्तरीय स्पर्धा सन २०२४-२५ परीक्षेत घवघवीत यश प्राप्त केले आहे. विद्यालयातील श्रीकृष्ण गादेकर या दुसरीच्या विद्यार्थ्याने राज्यातून तिसरा क्रमांक पटकावला आहे. जिल्हास्तरावर श्रेया लाड,ईश्वर सिरसट,श्रेया केंद्रे रौनक पोखरकर, गणेश कोळगावे,ध्रुव मुलगीर, अक्षरा मॅडमवार, प्रकाश भताने प्रकाश,गोविंदराज गुंडाळे,व्यंकटेश घुगे पृथ्वीराज भोसले,व्यंकटेश खाडे, शिवतेज जोगदंड, सोहम तळेकर या विद्यार्थ्यांनी घवघवीत यश मिळविले तर केंद्रातून ५७ विद्यार्थी गोल्ड मेडल, केंद्रातून १२६ विद्यार्थी सिल्वर मेडल तर ०५ विद्यार्थी हे ब्रांझ मेडल आहेत. एकूण २०६ विद्यार्थी परिक्षेसाठी प्रविष्ठ झाले होते. विद्यार्थ्यांच्या यशाबद्दल संस्थेचे संस्थापक अध्यक्ष डॉ.वि.दा.कराड, कार्यकारी संचालक राजेश कराड,शुभांगी कराड,प्राचार्य रामराजे कराड व सर्व शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या आहेत.

### माजी नगरसेविका चंद्रकला लांडे यांचे निधन

अंबड । प्रतिनिधी



अंबड शहरातील होळकर नगर येथील शिवसेनेच्या माजी नगरसेविका चंद्रकला भिवराजी लांडे यांचे दि.१० ऑगस्ट रोजी पहाटे ५ वा आजाराने निधन झाले.त्यांचेवर दुपारी १ वा शोकाकुल वातावरणात अंत्यसंस्कार करण्यात आले त्यांचे पश्चात गंगाराम लांडे, रामसेठ लांडे, आकाश लांडे असे तीन मुले ,तीन मुली सुना जावई नातवंडे असा मोठा परिवार आहे.

# आईचे वात्सल्य हेच मुलांचे सुसंस्कारीत जीवन घडवते - उद्धव महाराज

**शिरूर । प्रतिनिधी**

**घरामध्ये सुसंस्कारित मुले असली म्हणजे घरात सुख-समृद्धी नांदते. सुसंस्कारी मुले असावीत अशी प्रत्येक आई-वडिलांची इच्छा असते. सुसंस्कारित मुले घडवण्यासाठी आईचे वात्सल्य ही सुसंस्कारित असले पाहिजेत. किंबहुना आईचे वात्सल्य हेच सुसंस्कारी जीवन घडवत असल्याचे प्रतिपादन रामायणाचार्य हभप.उद्धव महाराज चोले यांनी मौजे फुलसांगवी येथे केले आहे.**



शिरूर कासार तालुक्यातील मौजे फुलसांगवी येथील रहिवासी असलेले सेवानिवृत्? प्रा. डॉ. विष्णू काकासाहेब सोनवणे व पत्नी सिंधू विष्णू सोनवणे या दांपत्याचा रविवार दि. १० ऑगस्ट रोजी चारीधाम परिपूर्ण मावंदेचा कार्यक्रम पार पडला यानिमित्त फुल सांगवी येथील श्री संत वामनभाऊ मंदिरामध्ये मराठवाडा भूषण रामायणाचार्य हभप.उद्धव महाराज चोले यांच्या कीर्तनाचे आयोजन करण्यात आले होते. प्रस्तुत कीर्तनामध्ये भाविकांना उपदेश करताना महाराज म्हणाले घरामध्ये कुठलेही धार्मिक कार्य पार पडायचे असेल तर त्या घरामध्ये सुसंस्कारितपणा असणं गरजेचे आहे. ज्या घरातील मुले सुसंस्करीत असतात त्या घरातील आई-वडीलही सुखी असतात. घरामध्ये सुख समृद्धी नांदावी असे वाटत असेल तर मुलांच्या बालमनावरती सुसंस्कारित पणा घडवावा. ही जबाबदारी त्या मुलांच्या आईची असते. तिच्या वात्सल्यातच जर सुसंस्कारित पणा असेल तर मुलेही सुसंस्कारित घडतात व त्यांच्याच हातून धर्मकार्य, सामाजिक कार्य, देश कार्य आदी सत्कर्म होत असतात म्हणून महिलांनी आपली मुले सुसंस्कारित व्हावीत म्हणून अगदी गरोदरपणापासून सुसंस्कारित वात्सल्य त्या बाळाला दिले पाहिजे. मुलगा दहा-बारा वर्षाचा होईपर्यंत मुलावर ती संस्कार करणे ही आईची जबाबदारी असते. याच काळात मुले सुसंस्कारित झाली म्हणजे त्यांचे जीवन ही सुसंस्कारी होऊन जाते. यासाठी आईचे वात्सल्य हे सुसंस्कारी असले पाहिजे किंबहुना आईचे वात्सल्यच मुलाचे सुसंस्कारित जीवन घडवत असल्याचे प्रतिपादन यावेळी हभप. उद्धव महाराज चोले यांनी केले आहे. यावेळी हभप.गिरीधारी महाराज शेळके, महादेव महाराज घुंगरड, भाऊसाहेब महाराज इंगोले, सुदाम महाराज देवकर, बळीराम महाराज तळेकर पांडुरंग महाराज तळेकर,बंडू महाराज तळेकर, दत्ता महाराज भालेकर विकास महाराज जायभाये, महादेव महाराज इंगळे, सुरंजन महाराज जायभाये आदी गुनिजनटाळकऱ्यांसह रमेश तळेकर, भगवान तळेकर, विश्वनाथ सानप, दिलीप खेडकर, हौसराव जायभाये, भरत सोनवणे, पोपटराव मिसाळ आदींसह मोठ्या संख्येने महिला पुरुष भाविक -भक्तांची उपस्थिती होती. आलेल्या भाविक भक्तांना व हितचिंतक नातलग मित्र परिवारांना यावेळी प्रा. विष्णू सोनवणे यांच्या वतीने स्नेह भोजनही देण्यात आले आहे.



### डॉ.सारिका क्षीरसागर यांच्याकडून सदिच्छा भेट

प्रा. विष्णू सोनवणे यांच्या मावंदे च्या कार्यक्रमाला राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी ( अजित पवार गटाच्या) नेत्या डॉ.सारिका क्षीरसागर यांनी सोनवणे परिवाराला सदिच्छा भेट देऊन वस्त्र भूषण देऊन शुभेच्छा दिल्या आहेत. यावेळी माजी जि. प.सदस्य सुभाष क्षीरसागर, भरत जाधव, रासपचे माऊली मार्कड, अर्जुन बाप्पा खेडकर, बाळासाहेब खेडकर, मोहनराव ढाकणे, नारायण काजळे यांची उपस्थिती होती.

# सशक्त समाज उभारणीसाठी प्रत्येकाने मानसशास्त्र समजून घ्यावे -डॉ.इंगोले

अंबाजोगाई । प्रतिनिधी

समाजात घडणाऱ्या प्रत्येक घडामोडी या मानवी मनाच्या बदलांमधून घडत असतात. त्यामुळे समाजात सकारात्मक बदल घडवून आणण्यासाठी समाजातील व्यक्तीचे निकोप मन व निरोगी मानसिक आरोग्य असणे गरजेचे आहे. त्यामुळे समाज उभारणीसाठी समाजातील प्रत्येक घटकाला मानसशास्त्राचा अभ्यास असणे गरजेचे आहे असे प्रतिपादन सुप्रसिद्ध मानसोपचार तज्ज्ञ डॉ.राजेश इंगोले यांनी केले.

येथील मानवलोक संस्थेद्वारा संचलित सोशल वर्क महाविद्यालयात आयोजित मानसशास्त्रीय वैद्यकीय परिषदेत ते प्रमुख व्याख्याता म्हणून बोलत होते. यावेळी विचारमंचावर प्राचार्य डॉ.प्रकाश जाधव, क्षेत्र कार्य समन्वयक प्रा.सुकेशिनी जोगदंड, प्रा.डॉ.नजीर शेख, प्रा.डॉ.अरूंधती पाटील, प्रा.डॉ.किसन शिनगारे, डॉ.वनिता माने, बिभीषण घाडगे यांची उपस्थिती होती. यावेळी बोलताना डॉ.राजेश इंगोले यांनी विविध मानसिक आजार त्यांची लक्षणे त्यावरील उपाययोजना यावर विस्तृत मार्गदर्शन आपल्या खुमासदार शैलीत विद्यार्थ्यांना केले. विविध उदाहरणे देत विविध मानसिक आजारांचे विद्यार्थ्यांना समजेल अशा भाषेत विश्लेषण करीत विविध मानसिक आजार विद्यार्थ्यांना समजावून सांगितले. समाजात वावरत असताना आपल्या आजूबाजूला ताण-तणावांनी ग्रस्त व्यक्ती किंवा मानसिक व्याधींनी ग्रस्त व्यक्ती आपणांस पहावयास मिळतात. परंतु, ते मानसिक आजारच आहेत याची कल्पना नसल्याने अशा व्यक्ती उपचार न मिळाल्यामुळे आत्महत्या किंवा आपल्या हिताला किंवा समाजाच्या हिताला बाधा पोहचेल अशा कृती करीत असतात मानसिक शास्त्रांचा अभ्यास झाल्यास अशा व्यक्ती आपल्याला योग्य त्या औषधोपचार व समुपदेशनाकरिता मानसोपचार तज्ज्ञांकडे पाठविता येतात व घडणाऱ्या संभाव्य दुष्परिणामांना रोखले जाऊ शकते. सामाजिक शास्त्रांचा अभ्यास करणाऱ्या विद्यार्थ्यांना आवर्जून मानसशास्त्र शिकविले गेले पाहिजे, ज्यामुळे ही मुले समाजात वावरत असताना या विषयीचे जनप्रबोधन करू शकतील. यावेळी डॉ.इंगोले यांनी व्यक्ती तेवढ्या प्रवृत्ती असे सांगत प्रत्येक व्यक्तीचे व्यक्तिमत्व हे वेगळे असते. प्रत्येक व्यक्तीमध्ये काही ना काही व्यक्तीदोष असू शकतात. प्रत्येक व्यक्ती हा सर्व गुणसंपन्न असू शकत नाही त्यामुळे आपल्यातील गुण दोष शोधून त्याला दुरूस्त करण्यासाठी प्रत्येक व्यक्तीला माणूस शास्त्रीय दृष्टिकोनातून आपल्या व्यक्तिमत्त्वाचा अभ्यास करण्यासाठी मानसशास्त्राचा अभ्यास असणे गरजेचे आहे.

# शेतकऱ्यांच्या पीक विम्याचे पैसे तात्काळ शेतकऱ्यांच्या खात्यावर वर्ग करा -प्रा.आंधळे

बीड । प्रतिनिधी

शेतकऱ्याचे पिक विम्याचे पैसे केंद्र व राज्य सरकारने विमाकंपन्यांना वर्ग केलेले असूनही केंद्रातील व राज्यातील या दोन्ही कृषी मंत्र्यांना शेतकऱ्याच्या बँक खात्यात पैसे वर्ग करण्याचा सापडेनासा झाला आहे मुहूर्त कधी सापडतो हे शेतकऱ्यांना कळेना झाले आहे शेतकरी प्रचंड अडचणीत आहे शेतकऱ्यांना सतत त्रास देण्याचे काम हे शासन करत आहे या देशातील शेतकरी राजा हा सतत कष्ट करणारा वर्ग आहे शेतीमध्ये राबराब राबायचे अनेक संकटावर मात करून उत्पन्न



काढायचे आणि बाजारामध्ये आडती वर गेल्यानंतर या उत्पन्नाचा भाव त्या आडती वाल्याने ठरवायचा अशी वाईट अवस्था शेतकऱ्याची आहे पिकवलेला माल आहे त्याची किंमत करण्याचा अधिकार सुद्धा शेतकऱ्याला नाही त्यामध्ये निसर्ग कोपला की पाऊस वेळेवर पडत नाही पाऊस पडला तरी कीटकनाशके औषधी खते बी बियाणे ही बोगस घ्यावी लागतात अशा अनेक संकटाचा शेतकऱ्यांना सामना करावा लागतो पाऊस जर वेळेवर नाही पडला तर शेतकऱ्यावर दुपार पेरणीची वेळ येते शेतकऱ्यांना ठिबक साठी कर्ज असेल स्प्रिंकलर साठी कर्ज असेल अशा वेगवेगळ्या प्रकारची कृषी कर्ज असतील हे कर्ज घेण्यासाठी बँका शेतकऱ्यांना लवकर कर्ज देत नाहीत आणि माझा शेतकरी राजा बँकेत चकरा मारू मारू कदरून जातो अशी परिस्थिती आज शेतकऱ्याची आहे शेतकऱ्यांना आर्थिक दृष्ट्या कमकुवत करून शासनाने खूप मोठे नुकसान केले आहे शेतकरी जगला पाहिजे यासाठी शासनाने विविध योजना राबवल्या पाहिजेत शेतकरी जर आज जगला तर देशामध्ये अन्नधान्याचा तुटवडा होणार नाही म्हणून शासनाने शेतकऱ्याच्या मालाला हमीभाव द्यावा केंद्र व राज्य शासनाने एक महिना झाला विमा कंपन्यांना पैसे वर्ग केले आहेत केंद्राच्या व राज्याच्या या दोन्ही मंत्री महोदयांना विनंती आहे की आपण शेतकऱ्याच्या बँक खात्यावर विम्याचे पैसे वर्ग करण्याचे आदेश तात्काळ काढावेत अशी मागणी ग्रामीण युवक संघटनेचे संस्थापक अध्यक्ष प्राध्यापक बबनराव आंधळे यांनी एका प्रसिद्धी पत्रकाद्वारे केली आहे

## नाकाडेवाडी येथे श्री.खंडोबा मंदिरात महाप्रसाद वाटप

पिंपळवंडी । प्रतिनिधी

पाटोदा तालुक्यातील नाकाडेवाडी (पिंपळवंडी) येथील श्री.खंडेश्वर मंदिरात शुक्रवार दि.८/८/२०२५ रोजी महाप्रसाद वाटपाचा कार्यक्रम मोठ्या भक्तिमय वातावरणात संपन्न झाला.पंचक्रोशीतील भाविकांनी मोठ्या संख्येने येऊन महाप्रसादाचा लाभ घेतला.गेल्या वर्षी नाकाडेवाडी येथील ग्रामस्थांच्या लोकसभागातून नाकडेवाडी येथे सुशोभित आकर्षक भव्य असे महाराष्ट्रातील भाविक- भक्तांचे श्रद्धास्थान असलेल्या श्री. खंडेरायाचे मंदिर बांधले असून,या मंदिरात श्री.खंडेराया,माळसा व बानू आधी देवतांची पौरोहितांच्या व महंतांच्या हस्ते विधिवत पूजा करून गेल्या वर्षी प्राणप्रतिष्ठा सोहळा करण्यात आला होता.श्रावण महिन्यानिमित्त या ठिकाणी महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते.या निमित्त बाबासाहेब बेद्रे गोंधळी व त्यांच्या सहकाऱ्यांनी रात्री जागरण गोंधळ कार्यक्रम साजरा केला.या कार्यक्रमाचा भाविक- भक्तांनी आस्वाद घेतला.कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी महादेव बाजीराव नाकाडे,पो.ह.दत्तात्रय नाकाडे,संजय नाकाडे सह रामदास नाकाडे,आजिनाथ नाकाडे,राजु नाकाडे,पांडुरंग नाकाडे,महादेव दशरथ नाकाडे,दिलीप नाकाडे,सुरेश नाकाडे,बाळासाहेब नाकाडे,हरि नाकाडे,बाबासाहेब नाकाडे आदीसह ग्रामस्थांनी परिश्रम घेतले.



तसेच हांडेवाडी येथील श्री. तुळजाभारती मंदिरातील अखंड हरिनाम सप्ताह सोहळ्यानिमित्त व रानमळा,पाटिल वस्ती येथील श्री. मारुती मंदिरात महाप्रसाद (भंडारा) कार्यक्रम दि.९/८/२०२५ शनिवार रोजी संपन्न झाला.या महाप्रसादाचा भाविक-भक्तांनी मोठ्या संख्येने येऊन लाभ घेतला.

# सांची बुद्ध विहारात श्रावण पौर्णीमा उत्साहात साजरी

**माजलगाव । प्रतिनिधी**

तथागत भगवान बुद्धांच्या जिवनात वर्षाच्या बारा पौर्णीमांना महत्व आसुन प्रत्येक पौर्णिमा बौद्ध बांधव विविध ठीकाणी उत्साहात साजरी करत आसतात याच प्रमाणे सांची बुद्ध विहार डॉ आंबेडकर भवन केसापुरी कॅम्प येथे भारतीय बौद्ध महासभा तालुका - शाखा माजलगांवच्या वतीने वर्षावासातील महत्वाची आसणारी श्रावण पोर्णिमा उत्साहात साजरी करण्यात आली.या कार्यक्रमाचे अध्यक्ष भारतीय बौद्ध महासभा तालुका अध्यक्ष डॉ भागवत साळवे हे होते तर या कार्यक्रमासाठी भारतीय बौद्ध महासभा जिल्हा बीडच्या वतीने राबवण्यात रेत असलेल्या प्रवचन मालीकेतील विषय घेऊन प्रमुख मार्गदर्शक म्हणुण भारतीय बौद्ध महासभा जिल्हा संस्कार सचिव श्यामभाऊ वाघमारे,जिल्हा हिशोब तपासणीस एम.वाय. काळे,जिल्हा संरक्षण सचिव आर. डी.जोगदंड हे उपस्थित होते तर प्रमुख पाहुणे म्हणुन भारतीय बौद्ध महासभा महिला जिल्हा अध्यक्षा कमलताई डोंगरे,जिल्हा संस्कार उपाध्यक्षा लिलाताई उजगरे,जिल्हा पर्यटन सचिव एन बी.राजभोज,जिल्हा संघटक शारदाताई तांगडे,वंचित बहुजन आघाडीचे जेष्ठ



नेते अंकुश जाधव,माजी संरक्षण उपाध्यक्ष गुलाब प्रधान, बहुजन समाज पार्टीचे,हरिभाऊ साळवे,शेलापुरीचे उपसरपंच शुशीलाताई घडसे हे उपस्थित होते.या कार्यक्रमात एम. वाय.काळे यांनी श्रावण पौर्णीमेचे महत्व सांगीतले व वर्षावासात चालु असलेले भगवान बुद्ध आणी त्यांचा धम्म या ग्रंथाचे वाचन केले,तर शामभाऊ वाघमारे यांनी महामंगल सुत -मानवाचे मंगल कशात आहे विषयी मार्गदर्शन केले.या कार्यक्रमाचे प्रस्ताविक भारतीय बौद्ध महासभा महिला तालुका अध्यक्षा मंदाताई साळवे यांनी केले तर सुत्रसंचलन संस्थेचे ता सरचिटनीस सिद्धार्थ वक्ते यांनी केले.तर या कार्यक्रमा साठी धम्म उपासिका यांच्या दानातुन भोजनदान देण्यात आले.हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी नाथा घडसे,डी पी पोटभरे आप्पा ,डी पी वाघमारे नाना,बाबासाहेब घनघाव,राजभाऊ साळवे,बळीराम काकडे, तात्यासाहेब साळवे ,कोमलताई डोंगरे,अनुराधाताई साळवे, विशाखाताई वाघमारे ,सिमा साळवे निलावती साळवे,चंद्रकला साळवे,गिरजाबाई पोहरे,गायकवाड ताई ,रमाताई राजभोज, प्रभाववती वाघमारे,वैभव साळवे,सह भारतीय बौद्ध महासभेचे पदाधिकारी यांनी परिश्रम घेतले.

## पान ६ वरुन...

पान ६ वरुन...

### पिंपळवंडी शिवारात

वाचवावेत व दुभती जनावरे पाळणे सुद्धा मुश्किल होणार आहे.यापूर्वीही धोपटवाडी,सरदवाडी,जरेवाडी, चंद्रेवाडी,हांडेवाडी येथील शेतकऱ्यांची बैल,गाय,वासरे,शेळ्या बिबट्यांनी हल्ले करून बळी घेतल्याचे प्रकार घडले आहेत.यावर वन विभागाने ठोस उपाययोजना करून शेतकऱ्यांच्या पशुधनाचे संरक्षण करून शेतकऱ्यांना आधार द्यावा.याबाबत वन विभागाने सतर्क राहून दक्षता घ्यावी अशी ही मागणी जोर धरत आहे.

### घोरपडीची तस्करी

दिसत आहे. घोरपड खाल्ल्याने सांधे, मणके, कंबरदुखी व होते. तेलाने मालिश केल्यास शरीरान मजबुती मिळते, अशा गैरसमजुतीतून तस्करीचे प्रकार वाढले आहेत.

तस्करी होत असेल तर थेट कारवाई

घोरपडीची अशी कुठे तस्करी होत असेल, तर संबंधितावर कायदेशीर कारवाई करण्यात येईल, असे आष्टी प्रभारी वनपरिक्षेत्र अधिकारी लक्ष्मण तागड यांनी लोकतंत्र बोलताना सांगितले.

### प्रतिकूल परिस्थितीमध्ये

विद्यार्थ्यांनी जागतिक आदिवासी दिनानिमित्त आपले मनोगत व्यक्त केले.यानंतर शाळेतील शिक्षिका श्रीमती सारिका डोंगरे मॅडम व पूनम लांब मॅडम यांनी गेली दहा-बारा दिवसापासून आदिवासी संस्कृतीच्या गाण्यांवर मुलींकडून सराव करून घेतला होता.त्या आदिवासी समाजातील विविध प्रकारचे सांस्कृतिक गीतावर,मुलींनी आपली कला, आदिवासी संस्कृतीचे मुलांनी स्व: हस्तकलेतून निर्मित केलेल्या बाहुल्या,कानातील अलंकार, राखी यांचे प्रदर्शन उपस्थित मान्यवरांचे, प्रमुख पाहुण्यांचे आणि उपस्थित सर्व पालक माता पिता समस्त गुरुजन वर्गाचे मन जिंकून घेत, कार्यक्रमाचे वातावरण अतिशय प्रसन्न,प्रफुल्लित करून सर्वांची मने जिंकली.शासकीय माध्यमिक आश्रम शाळा थेटेगव्हाण ता. धारूर जि.बीड या ठिकाणी जागतिक आदिवासी दिन उत्साहामध्ये साजरा करण्यात आला.याप्रसंगी मंचावर उपस्थित प्रमुख पाहुणे सर्व पालक वर्ग विद्यार्थी आणि समस्त शिक्षक व शिक्षक इतर कर्मचारी या सगळ्यांची उपस्थिती होती.या कार्यक्रमाचे उत्कृष्ट असे अलौकिक बहारदार सूत्रसंचालन शाळेतील शिक्षक श्री गोरक्षनाथ आबुज व संभाजी मुसळे सरांनी केले तर आभार प्रदर्शन शिवाजी गांधले सरांनी केले. याप्रसंगी शिक्षक श्री.मारूती राठोड,श्री.परमेश्वर तावसे, श्री.नागनाथ चात्रे,श्री.जी.बी आबुज, श्री.शिवाजी गांधले,श्री.संभाजी मुसळे,श्रीमती.सारिका डोंगरे,श्रीमती.पूनम लांब,श्री.बी.ए लोंढे,श्री.बी व्ही बडे,श्री.हनुमान केंद्रे यांच्यासह इतर कर्मचारी यांची उपस्थिती होती.शेवटी सर्वच उपस्थित मान्यवरांनी भोजनाचा आस्वाद घेऊन शाळेच्या परिसराची पाहणी केली.

### शेंडाळा शाळेत वृक्षांना

अकोलकर यांनी आपल्या मार्गदर्शनपर भाषणात सांगितले की, ''सण साजरा करताना आपण समाजाला आणि पर्यावरणाला काहीतरी चांगला संदेश द्यावा. वृक्षतोड टाळणे, जास्तीत जास्त वृक्षलागवड करणे आणि लावलेल्या झाडांचे संवर्धन करणे हे प्रत्येकाचे कर्तव्य आहे.''सहशिक्षक महादेव आमले, प्रवीण धोंडे, जयश्री ढोले, जयश्री नवले यांनी विद्यार्थ्यांना वृक्षसंवर्धनाचे महत्त्व पटवून दिले. अंगणवाडी सेविका छाया भापसे यांनी लहान मुलांमध्येही पर्यावरणपूरक संस्कार रुजावेत यासाठी आपले विचार मांडले. या कार्यक्रमात सर्व विद्यार्थी-विद्यार्थिनींसह पालक आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. शेवटी विद्यार्थ्यांनी ''आम्ही झाडांचे रक्षण करू'' अशी सामूहिक शपथ घेतली. हा उपक्रम केवळ शाळेतच नव्हे तर संपूर्ण गावात चर्चेचा विषय ठरला असून, गावातील अनेकांनी वृक्षसंवर्धनासाठी पुढाकार घेण्याचा संकल्प केला आहे.

# दास्य भक्तीचा सर्वोच्च आदर्श हनुमंतराव - हभप रोहिणीताई परांजपे

बीड प्रतिनिधी

देवाच्या दारात जाण्यासाठी सेवा दारवांटा आहे. दास्य भक्तीचा सर्वोच्च आदर्श रामायणात हनुमंतराय आहेत. अशा प्रतिपादन श्री ह भ प रोहिणी ताई परांजपे यांनी केले. धारूर तालुक्यातील चारदरी येथील जागरण हनुमान मंदिर या ठिकाणी तिसऱ्या श्रावण शनिवारी आयोजित कीर्तन सोहळा त्या बोलत होत्या.. यावेळी प्रमुख उपस्थिती श्री ह भ प डॉ.सुदाम महाराज पानेगावकर, श्री ह भ प डॉ नाना महाराज कदम, श्री ह भ प विठ्ठल महाराज आंधळे शास्त्री, श्री ह भ प सुरेश महाराज जाधव.श्री ह भ बाबा महाराज मुंडें, शिवाजी तोंडे सर यांच्या सह हजारो भावी भक्तांची उपस्थिती होती..





धारूर तालुक्यातील श्रीक्षेत्र चारदरी येथे जागृत हनुमान मंदिरात दुसऱ्या श्रावण शनिवारी गेल्या १९ वर्षापासून तोंडे कुटुंब ज्ञानदान व अन्नदानाचे सेवा करत आहे. यावर्षी महाराष्ट्रातील सुप्रसिद्ध कीर्तनकार कीर्तन चंद्रिका सुनीताई परांजपे यांचे कीर्तन संपन्न झाले. यावेळी त्यांनी संत ज्ञानेश्वर महाराजांच्या

तुझी सेवा करीन मी मनोभावें वो ।<br>
माझें मन गोविंदीं रंगलें वो ।।१।।<br>
नवसिये नवसिये माझे नवसीयेवो ।।<br>
पंढरिचे दैवते विठ्ठले नवसिये वो ।।२।।<br>
बापरखुमादेवीवरे विठ्ठले वो ।<br>
चित्तीं चैतन्य चोरुनि नेलें वो ।।३।।

या अभंगावर सुंदरचिंतन मांडले यावेळी बोलताना रोहिणी ताई यांनी देवाच्या दारात जाण्यासाठी सेवा दारवांटा त्यामुळे सेवा करणं महत्त्वाचं चार्जर येथील हनुमान मंदिराची सेवा केली तर त्याचे फळ मिळतेच. सामान्य जीव देवाकडे सर्व गोष्टी मागतात मात्र देवाकडे देव मागत नाही. संत हे देवाकडे देवालाच मागतात. अध्यात्म कीर्तन वारकरी परंपरा यात वारकरी संतांनी समतेची दृष्टी दिली. संत ज्ञानेश्वर महाराजांनी भावार्थदीपिका ही गीतेवरील टीका केली.भाव हा भक्तीचा अलंकार आहे.माणसाचा देव झाला पाहिजे.यासाठी अध्यात्म आहे. संताना अपेक्षित समाज घडण महत्वाच आहेत. असं चिंतन रोहिणी ताई यांनी मांडलं..

कीर्तनानंतर सामाजिक क्षेत्रात काम करणारे डॉक्टर सुदाम महाराज पानेगावकर यांना समाजभूषण म्हणून गौरविण्यात आले.. तर लिहावा प्रा. डॉ नाना महाराज कदम यांना अध्यात्म भूषण पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. कीर्तनानंतर उपस्थित हजारो जनसमुदायाला बुंदी ,चपाती ,भात भाजी ,अशा महाप्रसादाचे वाटप करण्यात आले. यावेळी मंदिर परिसरात मोठ्या पंक्ती बसल्या होत्या हजारोच्या पंखेला वाढण्याचे काम चार्जर येतील तरुण मंडळांनी केले.. या संपूर्ण कार्यक्रमाचे आयोजन शिवाजी तोंडे यांचे दोन्ही मुल भारत तोंडे आणि मोहन तोंडे यांनी केले होते.

चारदरी ते जागृत हनुमान मंदिर भक्ताच्या भावनेला फळ देणारी आहे.त्यामुळे जीवन आनंदाने जगा एकमेकांचा द्वेष मत्सर करणं सोडून द्या. सर्व जाती धर्माच्या लोकांनी एकोप्याने आनंदाने जगा हाच संत भगवान बाबांचा संदेश आहे. तोंडे कुटुंबाने १९ वर्ष निस्वार्थपणे समाज एकत्रित करण्याचे काम करत आहे . त्यांचा आदर्श इतरांनी घ्यावा..

प्रा डॉ - नाना महाराज कदम नेकनुरकर

..आम्ही ज्ञानोबा तुकोबाचे आहोत..

राजकारण स्वार्थी आहे.अध्यात्म एकत्रित करणारे आहे..आम्ही एका जातीचे समाजाचे नाही तर आम्ही ज्ञानोबा तुकोबाचे आहोत.या जाती पाती बाजूला सारून एकत्रित या.सामाजिक सौख्य बिघडू देऊ नका. माणसा मधील जिव्हाळा कमी होऊ देऊ नका. बिघडलेला सामाजिक स्वास्थ अध्यात्मक सुधारू शकते त्यामुळे अध्यात्माची कास सोडू नका.

डॉ.सुदाम महाराज पानेगावकर

cmyk

राज्य लोकतंत्र
शेत-शिवार
सोमवार दि.११ ऑगस्ट २०२५


# मुंबईला राहून शेती परवडणार नाही, पिकांचं वाण बदलून नाविण्यपूर्ण प्रयोग केले पाहिजेत

शेती परवडतच नाही, परवडतच नाही असे रडगाणे गायचे, पण शेती कोणाला परवडत नाही? मुंबईला राहून शेती परवडणार नाही असे वक्तव्य राज्याचे कृषीमंत्री दत्तात्रय भरणे यांनी केलं आहे. शेतीत चढ-उतार होतातच, असेही ते म्हणाले. उच्चशिक्षित तरुण प्रयोगशील शेती करत असल्याचं उदाहरणही भरणे यांनी दिलं. कधीकधी अवकाळी पाऊस येतो. शेतीत कमी जास्त होते असेही ते म्हणाले. मुंबईला राहून शेती परवडणार नाही असेही भरणे म्हणाले.

पिकांचे वाण बदलले पाहिजे

मुंबईला राहून शेती परवडणार नाही. कधीकधी अवकाळी पाऊस येतो. शेतीत कमी जास्त होते. आपण नियोजन करुन नाविन्यपूर्ण प्रयोग केले पाहिजे असे भरणे म्हणाले. पिकांचे वाण बदलले पाहिजे. उसाचे बेणं देखील बदललं पाहिजे. नवीन टनेज देणारे बेणे वापरले पाहिजे. कांद्याचे सोयाबीनचे कोणते बियाणे वापरले पाहिजे हे पाहिले पाहिजे. शेतकऱ्यांची शिकलेली मुलं शेतात चांगल्या प्रकाराचे पिकं घेत असल्याचे दत्रात्रय भरणे म्हणाले. यावेळी त्यांनी मनातील खंत व्यक्त करताना मला हलकं-फुलकं आवडतं तो आनंद गोड असतो असे ते म्हणाले.

दिसतं तसं नसतं, म्हणूनच जग फसतं

सर्वजण सुखी नसतात, प्रत्येकाला कुठेतरी दु:ख असतं. मंत्र्यालाही किती वेदना असतात ते मला माहीत आहे. दिसतं तसं नसतं, म्हणूनच जग फसतं असेही भरणे म्हणाले. जुन्नर तालुक्यातील पीडीसीसी बँकेच्या शाखा उद्घाटन प्रसंगी भरणे बोलत होते. आयुष्यात आपल्याला जिथं जिथं संधी मिळते तिथं आपण संधीचं सोनं केलं पाहिजे असे भरणे म्हणाले. आनंद द्यायचा असतो आणि तो घ्यायचा असतो. पुढच्या माणसाला ज्यावेळी आनंद आपण देऊ, तेवढा उलटा दहापट आनंद आपल्याला मिळल्याशिवाय राहत नाही हा माझा पहिल्यापासूनचा अनुभव असल्याचे दत्तात्रय भरणे म्हणाले. जगात प्रत्येकजण सुखी नाही. दु:ख, टेन्शन, संकट प्रत्येकालाच आहे. महिला बघिनींना वाटले असेल की काय त्या मंत्र्यांची मजा आहे, पण माझं मन मलाच माहित आहे. शेवटी दिसते तसे नसते म्हणूनच जग फसते असे भरणे म्हणाले. हसत राहा आनंदात राहा आणि माझंच बरं आहे असे सकारात्मक दृष्टीकोण ठेवा असेही भरणे म्हणाले.



# पॉली मल्चिंगचा उपयोग वाढला




शेतकरी केळीसह अन्य भाजीपाला पिकांसाठी पॉली मल्चिंगचा अधिकचा उपयोग करीत आहेत. यातून उत्पादन वाढीसह पाण्याची कटकसर करण्यास बळ मिळत असल्याचे शेतकऱ्यांचे म्हणणे आहे. मल्चिंग पेपर व ठिबक सिंचन वापरल्यामुळे शेतकऱ्यांना कमी पाण्यामध्ये चांगले उत्पन्न मिळत आहे. त्याचबरोबर पिकांच्या सोबतीने वाढणाऱ्या तणावरदेखील नियंत्रण राखता येत आहे. त्यामुळे तण काढणीवर होणारा शेतकऱ्यांचा खर्च यामुळे वाचत आहे. पेपरच्या आच्छादनामुळे तापमान आणि आर्द्रता नियंत्रित होत असल्याने पीकवाढीला फायदा होत आहे. त्याचबरोबर किडीचा प्रादुर्भाव होण्यापासून पिकाला वाचविता येत आहे. अतिरिक्त पाऊस झाला तरी त्याचा फारसा परिणाम उत्पादनावर होत नसल्यामुळे मल्चिंगचा वापर अधिक प्रमाणात परिसरातील शेतकरी करू लागले आहेत.

मल्चिंग पेपर आच्छादनासाठी साधारणता ३० ते ३२ हजार रुपये हेक्टरी खर्च येतो. यासाठी शासनाची अनुदान योजनादेखील उपलब्ध आहे. या योजनेतून शेतकऱ्यांना १६ हजार रुपयांपर्यंत हेक्टरी अनुदान मिळते. या योजनेला प्राप्त करून घेण्यासाठी कृषी विभागाशी संपर्क करावा लागतो. त्यामुळे या योजनेत अनेक शेतकरी सहभागीदेखील आहेत.

मल्चिंग पेपरबरोबरच शेतकरी मिरची, कलिंगड, टोमॅटो आदींच्या रोपांवर भर देत आहेत. आधी बियाणे जमिनीत रोवून त्या बियाण्यांच्या माध्यमातून पिकांची उगवण केली जात होती; परंतु आता शेतकरी तयार रोपांची लागवड करत असल्याने पिकांचा कालावधी काहीअंशी कमी होत आहे. रोपांच्या लागवडीतून पिकाची निगा राखणे शेतकऱ्यांना सोपे जात आहे. रोपलागवडीतून मररोगावर नियंत्रण राखता येत आहे. त्याचबरोबर योग्य खते, तसेच विविध कीटकनाशके तसेच पोषक द्रव्यांचा वापर करून अधिक उत्पन्न मिळविता येते आहे. एकंदरीत परिसरातील शेतकरी आधुनिक शेतीकडे वळत आहे.

# वांगे पिकातील फळ पोखरणारी आळी नियंत्रन

वांग्याचे पीक घेत असताना चांगले व्यवस्थापन करूनही अपेक्षित उत्पादन भेटत नाही. उत्पादन न निघण्याचे बरीच कारणे आहेत. त्यापैकी वांगी पिकावर येणारी कीड हे प्रमुख कारण आहे. वांगी पिकातील शेंडा व फळे पोखरणारी अळीची लागण खूप मोठ्या प्रमाणावर होते. त्यामुळे किडीचा प्रधुरभाव ओळखून वेळीच उपाययोजना केल्यास कीड नियंत्रणात येऊ शकते.वांगी पिकामध्ये येणाऱ्या शेंडा व फळे पोखरणाऱ्या अळीच्या प्रादुर्भावामुळे सर्वसाधारणपणे ४० टक्क्यांपर्यंत नुकसान होते. वेळीच उपाययोजना न केल्याचे नुकसान १०० टक्क्यांपर्यंत जाऊ शकते. वांग्यावरील शेंडा व फळे पोखरणारी अळी ही कीड अंडी, अळी, कोष व प्रौढ अशा चार अवस्थांमधून आपले जीवन पूर्ण करते. त्यापैकी अळी अवस्था आर्थिकदृष्ट्या नुकसानकारक असते. या किडीची अळी छोटी व फिक्कट गुलाबी रंगाची असते. पतंग मध्यम आकाराचा असून पुढील पंख पांढरे व त्यावर तपकिरी रंगाचे ठिपके असतात.



जीवनक्रम : या किडीची मादी एकानंतर एक अशी २५० अंडी झाडाच्या पानावर, शेंड्यावर, फुलकळ्यावर आणि कोवळ्या फळांवर घालते. अंडी गोलाकार व सफेद पिवळसर रंगाची असतात. ही अंडी ३-५ दिवसांनी उबतात व त्यातून सफेद अळी बाहेर पडते. ही अळी पिकाच्या सुरुवातीच्या अवस्थेतील शेंडा व फळधारणा वेळी फळांमध्ये नुकसान करते. ही अळी १५-२० दिवसांनी प्रौढ बनून गुलाबी रंगाची दिसते, नंतर ती शेंडा अथवा फळांमधून निघून जमिनीत अथवा पालापाचोळ्यात किंवा मुळाजवळ कोषावस्थेत जाते. आठवडाभराच्या कालावधीनंतर कोषामधून प्रौढ (पतंग) बाहेर येतो. प्रौढांचे आयुष्य ६-१० दिवसांचे असते.

नुकसान : या किडीचा प्रादुर्भाव रोप लावल्यानंतर काही आठवड्यानंतर दिसून येतो. अळी प्रथम पानाच्या देठात, कोवळ्या शेंड्यात शिरून आतील भाग खाते. या किडीचे प्रमुख लक्षण म्हणजे प्रादुर्भावग्रस्त शेंडे वाळतात. पीक फुलोऱ्यावर आल्यानंतर अळी कळी पोखरून आत शिरते, प्रादुर्भावग्रस्त फुले फळ न धरता वळून, सुकून जमिनीवर गळून पडतात. फळे आल्यानंतर ही अळी सुरवातीला छिद्र करून फळांत प्रवेश करून विष्ठेद्वारे प्रवेशद्वार बंद करते. ६. त्यामुळे बाहेरून फळ किडल्याचे लवकर लक्षात येत नाही. आतील गर खाऊन विष्ठा आतच सोडत असल्यामुळे कीडग्रस्त फळे खाण्यास अयोग्य ठरतात.

लागवडपुर्वी काळजी : उन्हाळ्यात जमिनीची खोल नांगरणी करावी, त्यामुळे किडींच्या विविध अवस्था नष्ट होतात. एकाच शेतामध्ये वर्षानुवर्षे वांग्याचे पीक घेऊ नये. जास्त प्रादुर्भाव झालेल्या शेतामध्ये पुढच्या वर्षी वांग्याचे पीक घेणे टाळावे. पिकाची योग्य प्रकारे फेरपालट करावी मागील पिकांचे अवशेष गोळा करून नष्ट करावेत. लागवडीसाठी वांग्याच्या सुधारित व शिफारशीत वाणांचा वापर करावा. या पिकाला गरजेनुसार खतमात्रा द्यावी. आवश्यकतेनुसार पाणी द्यावे. प्रादुर्भावग्रस्त झाडाचे शेंडे व फळे तोडून अळ्यांसहीत त्यांचा नायनाट करावा. वाणांच्या शिफारशीनुसार दोन झाडांमधील व दोन ओळींतील अंतर ठेवावे. प्रकाश सापळ्यांचा उपयोग करून पतंग नष्ट करावेत. वांगी पिकामध्ये सर्वेक्षणासाठी एकरी पाच कामगंध सापळे पिकाच्या वर एक फूट उंचीवर लावावे. शेंडा व फळे पोखरणाऱ्या अळ्यांच्या तीव्रतेची कल्पना येईल. पाच टक्के निंबोळी अर्काची किंवा (अँझाडिरेक्टीन १० हजार पीपीएम ) २.५ मि.लि. प्रतिलिटर पाणी याप्रमाणे प्रतिबंधात्मक फवारणी करावी.

१०. जैविक कीड नियंत्रणासाठी ट्रायकोडर्मा व ब्रेकॉन या परोपजीवी कीटकांच्या अंड्याचे प्रसारण करावे. वरील उपाययोजना केल्यावरही शेंडा व फळे पोखरणारी अळीचा प्रादुर्भाव आर्थिक नुकसानीची पातळी पेक्षा अधिक आढळल्यास, रासायनिक नियंत्रण याचा विचार करावा.

रासायनिक नियंत्रण : बायर सोलोमन (बीटा-साइफ्लुथ्रिन + इमिडाक्लोप्रिड ३०० ओडी) - १५ मिली. प्रोफेक्स सुपर (प्रोफेनोफोस ४०% + सायपरमेथ्रिन ४% ईसी) -३० मिली. बायर डेसिस १०० ईसी (डेल्टामेथ्रिन १०० ईसी) - १० मिली. डाऊ अॅग्रो सायन्स ट्रेसर (स्पिनोसॅड ४५% एससी) - ८ मिली. एफएमसी कोराजन (क्लोरॅनट्रानिलीप्रोल, १८.५% ) एससी - ६ मिली.

## दिन विशेष

### महत्वाच्या घटना

इ.स.पू. ३११४ : मेसोअमेरिकन लॉन्ग कॅलेंडर सुरु झाले.
१८७७ : अमेरिकन खगोलशास्त्रज्ञ हॉल यांनी मंगळाच्या फोबॉस व डिमॉस या चंद्रांचा शोध लावला.
१९४३ : सी. डी. देशमुख हे 'रिझर्व्ह बँक ऑफ इंडीया'चे पहिले भारतीय गव्हर्नर झाले.
१९५२ : हुसेन बिन तलाल जॉर्डनचे राजे बनले.
१९६० : चाडला (फ्रान्सपासुन) स्वातंत्र्य मिळाले.
१९६१ : दादरा व नगर हवेली हा भाग भारताचा केन्द्रशासित प्रदेश बनला.
१९७९ : गुजरातेतील मोर्वी येथे धरण फुटून हजारो लोक मृत्यूमुखी पडले.
१९८७ : 'युनायटेड स्टेट्स फेडरल रिझर्व्ह'च्या अध्यक्षपदी अॅलन ग्रीनस्पॅन यांची निवड झाली.
१९९४ : अफ्रिकन नॅशनल काँग्रेसच्या ज्येष्ठ नेत्या व डॉ. नेल्सन मंडेला यांच्या निकटवर्ती सहकारी डॉ. फातिमा मीर यांना 'विश्वगुर्जरी पुरस्कार' जाहीर
१९९९ : शतकातील शेवटचे खग्रास सूर्यग्रहण झाले.
१९९९ : बारा वर्षाखालील मुलांच्या राज्यस्तरीय जलद बुद्धीबळ स्पर्धेत नवी दिल्ली येथील सहा वर्षे वयाच्या परिमार्जन नेगी याने विजेतेपद पटकावले. ही स्पर्धा जिंकणारा आजवरचा तो सर्वात छोटा खेळाडू आहे.
२००३ : नाटो अफगाणिस्तानमधील शांती सैन्याची कमान हाती घेतली, ते नाटोचे ५४ वर्षांच्या इतिहासात युरोपबाहेरील पहिले मोठे ऑपरेशन आहे.
२०१३ : डॉ. सुब्रम्हण्यम स्वामी यांच्या जनता पक्षाचे भारतीय जनता पक्षात विलीनीकरण झाले.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१७७८ : जर्मन व्यायामशाळेचे शिक्षक आणि राष्ट्रवादी फ्रेडरिक लुडविग जॉन यांचा जन्मदिन.
१८९७ : एनिड ब्लायटन बालसाहित्यासाठी प्रसिद्ध असलेल्या इंग्लिश लेखिका (मृत्यू: २८ नोव्हेंबर १९६८)
१९११ : प्रेम भाटिया पत्रकार, संपादक, राजकीय विश्लेषक आणि मुत्सद्दी (मृत्यू: ८ मे १९९५)
१९२८ : रामाश्रेय झा संगीतकार, वादक व शास्त्रीय संगीतातील विद्वान (मृत्यू: १ जानेवारी २००९)
१९२८ : विनायक सदाशिव तथा वि. स. वाळिंबे लेखक व पत्रकार (मृत्यू: २२ फेब्रुवारी २०००)
१९४३ : जनरल परवेझ मुशर्रफ पाकिस्तानचे १० वे राष्ट्राध्यक्ष
१९४४ : फेडएक्स कंपनीचे संस्थापक, अध्यक्ष व मुख्य कार्यकारी अधिकारी फ्रेडरिक स्मिथ यांचा जन्मदिन.
१९४९ : भारतीय अर्थशास्त्रज्ञ, सेंट्रल बँकर आणि निवृत्त आयएएस अधिकारी तसचं, भारतीय रिझर्व्ह बँकचे माजी २२ वे गव्हर्नर दुव्वरी सुब्बाराव यांचा जन्मदिन.
१९५४ : यशपाल शर्मा क्रिकेटपटू
१९५४ : क्रिकेटपटू यशपाल शर्मा यांचा जन्म.
१९५० : ऍपल इन्क कंपनीचे सहसंस्थापक स्टीव्ह वोजनियाक यांचा जन्म.
१९७४ : अर्जुन पुरस्कार सन्मानित माजी भारतीय क्रिकेटपटू व कर्णधार अंजू जैन यांचा जन्मदिन.

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१९०८ : खुदिराम बोस क्रांतिकारक (जन्म: ३ डिसेंबर १८८९)
१९७० : इरावती कर्वे साहित्य अकादमी व महाराष्ट्र शासन पुरस्कार विजेत्या मानववंशशास्त्रज्ञ, समाजशास्त्रज्ञ व शिक्षणतज्ञ (जन्म: १५ डिसेंबर १९०५)
१९९९ : रामनाथ पारकर क्रिकेटपटू (जन्म: ३१ आक्टोबर १९४६)
२००० : पी. जयराज मूकपटांच्या जमान्यापासून हिन्दी चित्रपटसृष्टीचे साक्षीदार असलेले दादासाहेब फाळके पुरस्कार विजेते (१९८०) अभिनेते (जन्म: २८ सप्टेंबर १९०९)
२००३ : अर्मांड बोरेल स्विस गणितज्ञ (जन्म: २१ मे १९२३)
२०१३ : भारतीय पक्षीशास्त्रज्ञ आणि लेखक जफर फटहॅली यांचे निधन. (जन्म: १९ मार्च १९२०)


# ऑगस्टमध्ये करा या भाजीपाला पिकांची लागवड

ऑगस्ट महिन्यात अधिक नफा देणारी भाजीपाला पिके घेऊन उत्पन्न वाढवण्याची शेतकऱ्यांसाठी ही सुवर्णसंधी आहे. ऑगस्ट महिना हा विविध प्रकारची पिके लावण्यासाठी योग्य समजला जातो. विशेषत: भाजीपाला पिकातून अधिक उत्पन्न मिळू शकते. नवनवीन शेती तंत्राचा अवलंब करण्याचा कल वाढत असताना, जलद नफा मिळवणाऱ्यांसाठी भाजीपाला लागवड अधिक लोकप्रिय होत आहे.

फुलकोबी आणि कोबी : फुलकोबी आणि कोबी लावण्यासाठी ऑगस्ट हा उत्तम काळ आहे. महिन्याच्या सुरुवातीला रोपवाटिका तयार करून सुरुवात करा आणि ऑगस्टच्या मध्यापर्यंत रोपे लावा. ही पिके साधारणपणे ७० ते ८० दिवसांत परिपक्व होतात. बाजारातील त्यांची स्थिर मागणी लक्षात घेता, ते उत्तम कमाईची क्षमता ठेवतात. वाढ आणि उत्पन्न वाढवण्यासाठी तुमच्या भागात अनुकूल असलेल्या संकरित बियांची निवड करा.

भेंडी : फायद्याचे पीक घेऊ इच्छित शेतकऱ्यांसाठी ऑगस्टमध्ये लागवड केलेल्या उशिरा परिपक्व होणाऱ्या भेंडीच्या जाती नोव्हेंबरपर्यंत काढणीस तयार होतात, ज्यामुळे लक्षणीय नफा मिळतो. रोग आणि कीटकांचा धोका कमी करण्यासाठी, निरोगी आणि अधिक उत्पादनक्षम पीक सुनिश्चित करण्यासाठी संकरित बियाण्याची शिफारस केली जाते.

पालक : पालक ऑगस्टमध्ये वाढतो आणि जलद परतावा देतो . केवळ २५ ते ३० दिवसात तयार होतो, त्यामुळे जलद नफ्यासाठी हा एक उत्कृष्ट पर्याय आहे. पावसाळ्यात, तुमच्या पालकाला जास्त ओलाव्यापासून वाचवण्यासाठी गादी वाफा किंवा ''मेड'' पद्धत वापरा. घरचे बियाणे वापरत असल्यास, त्यांची उगवण क्षमता तपासून घ्यावी.



टोमॅटो : बाजारातील सातत्यपूर्ण मागणीमुळे टोमॅटो हे शेतकऱ्यांचे बारमाही आवडते पीक आहेत. रोपवाटिका तयार करून लागवड करा आणि ऑगस्टच्या सुरुवातीला बियाणे लागवड करता येते. सुमारे ६५ ते ७० दिवसांत पिकलेले टोमॅटो काढणीस तयार होतात. मुसळधार पावसाच्या परिणामांचा सामना करण्यासाठी, पाण्याचे नुकसान कमी करण्यासाठी आणि निरोगी झाडे सुनिश्चित करण्यासाठी मल्चिंग, गादी वाफा किंवा वेलींना आधार देणे या पद्धतींचा वापर करा.

मुळा : मुळा ऑगस्ट महिन्यात लागवडीसाठी एक उत्कृष्ट पीक आहे. पुसा चेटकी, सिंजेंटा आणि सोमाणी या जाती यावेळी लागवडीसाठी योग्य आहेत कारण या जाती जलद वाढतात आणि योग्य रित्या व्यवस्थापन केल्यास ते कमी कालावधीत भरीव परतावा देतात.ग्रीन बीन्स किंवा फरसबी : ग्रीन बीन्स हे ऑगस्ट महिन्यात लागवडीसाठी आणखी एक उत्कृष्ट पीक आहे. ते झपाट्याने वाढतात आणि ५० ते ६० दिवसात काढता येतात. ग्रीन बीन्सची मागणी जास्त आहे, आणि ते विविध प्रकारच्या जमिनीमध्ये घेतले जाऊ शकते. ज्यामुळे ते एक बहुपयोगी आणि फायदेशीर पर्याय आहे. या पिकाचे जास्तीत जास्त उत्पादन घेण्यासाठी पिकाला योग्य आधार द्यावे आणि नियमित कापणी सुनिश्चित करा.

ढोबळी मिरची : ऑगस्टच्या उबदार हवामान ढोबळी मिरचीसाठी अनुकूल समजले जाते. पाण्याचा निचरा होणार्या जमिनीत रोपे लावून सुरुवात करा आणि त्यांची वाढ झाल्यावर पुरेसा आधार द्या. ढोबळी मिरची परिपक्व होण्यासाठी सुमारे ७० ते ८० दिवस लागतात आणि त्यांचे आकर्षक रंग आणि कुरकुरीत पोत यामुळे बाजारपेठेत त्यांना चांगली मागणी असते.

काळजीपूर्वक लागवड केल्यास शेतकऱ्यांना चांगला परतावा देऊ शकतात.

शेतकरी ऑगस्टच्या अनुकूल वाढीच्या परिस्थितीचा पुरेपूर फायदा घेऊन या सात पिकांवर लक्ष केंद्रित करून कृषी उत्पन्नात लक्षणीय वाढ करू शकतात. यातील प्रत्येक भाजी अद्वितीय फायदे देते आणि योग्य तंत्रे आणि योग्य व्यवस्थापनाने प्रभावी नफा मिळवून देऊ शकते.

# भक्ती मार्गावर जाण्यासाठी जात धर्म लागत नाही- जयदत्त क्षीरसागर

बीड । प्रतिनिधी

जिल्ह्यात ज्या-ज्या ठिकाणी गड आणि संस्थान आहेत अशा ठिकाणी लाखो लोकांचा जनसमुदाय वारकरी सांप्रदायाच्या भक्तिमार्गावर दिसतो आहे. त्यामुळे भक्ती मार्गावर जाण्यासाठी जात धर्म लागत नाही हेच यावरून लक्षात येते. गोरक्षनाथ टेकडीचा विकास होत असताना यासाठी भरीव निधीची गरज आहे बीड जिल्ह्यातील प्रत्येक गडाचा आणि संस्थानचा विकास व्हायलाच हवा असे प्रतिपादन माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर यांनी केले. वै.किसन बाबा महाराज यांच्या २७ व्या पुण्यस्मरणानिमित्त ढेकणमोहा जवळील श्रीक्षेत्र संस्थान गोरक्षनाथ टेकडी येथे अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन करण्यात आले होते. शनिवारी ह.भ.प. संजय महाराज पाचपोर यांच्या काल्याच्या किर्तनाने सप्ताहाची सांगता झाली. यावेळी माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर, खा.बजरंग सोनवणे, युवा नेते डॉ. योगेश क्षीरसागर, प्रा. जगदीश काळे, विलास बडगे, दिनकर कदम, अरुण डाके, गंगाधर घुमरे, गणपत डोईफोडे, सुभाष क्षीरसागर, सखाराम



मस्के, अरुण बोंगाणे, ह.भ.प. हरिदास जोगदंड यांच्यासह अनेक मान्यवरांची उपस्थिती होती.

यावेळी माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर यांनी मठाधिपती नवनाथ बाबा यांचे आशीर्वाद घेतले याप्रसंगी संबोधित करताना ते म्हणाले की, पाऊस असतानाही लाखो भाविकांची गर्दी गोरक्षनाथ टेकडीवर आहे यावरूनच टेकडीचे महत्त्व दिसू लागले आहे. या टेकडीवर गोरक्षनाथाच्या सहवासाने पवित्र झालेल्या या परिसराचा विकास होण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करणे गरजेचे आहे. सत्तेवर असताना आपण ज्या-ज्या सुख सुविधा आवश्यक होत्या त्या आपण आग्रहाने उपलब्ध करून दिल्या आहेत.

सत्ता असो अथवा नसो देवस्थान विकासासाठी आपण सातत्याने प्रयत्न करत असतो सध्याचे लोकप्रतिनिधींनी यासाठी पुढाकार घेऊन जिल्ह्यातील प्रत्येक गडाचा आणि संस्थानचा विकास करायला हवा, ही आपली ठेव आहे याचे जतन करणे हे प्रत्येकाचे कर्तव्य आहे.

वारकरी संप्रदायाने दिलेला मूळ मंत्र प्रत्येकाच्या मनात आहे आज रक्षाबंधन असतानाही महिलांनी मोठ्या संख्येने या ठिकाणी उपस्थिती दाखवली, भक्तिमार्गावर जाण्यासाठी जात-धर्म लागत नाही आपण आयुष्यात काय कमावतो हे प्रत्येकाने लक्षात घ्यायला हवं असे सांगून आलेल्या सर्व भाविकांना शुभेच्छा दिल्या. यावेळी विष्णू महाराज लांडे, गोरख दन्ने, यादव सुरवसे, हनुमान देवकते, रामा भोगे, बालाप्रसाद जाजू, ओमप्रसाद खवतड, संदीप डावकर, नारायण माने, बंडू गाडीवान, नवनाथ घोडके, विक्रम करांडे, बंडूपंत लांडे, विष्णूपंत काळे, नागेश शिंदे, राजेंद्र पवार, नारायण देवकते, महादेव थापडे, बाजीराव पवार, देवराव घोडके, सोमनाथ माने यांच्या सह भाविक भक्तांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

## धानोरा रोड बनला रस्त्याऐवजी मृत्यूचा सापळा

### खड्ड्यांनी नागरिकांचे हाल-रंजीत बनसोडे





बीड । प्रतिनिधी

धानोरा रोडवरील अत्यंत खराब परिस्थितीमुळे स्थानिक नागरिकांचे रोजचे जीवन धोक्यात आले आहे. गुडघ्याएवढे खोल खड्डे, धुळीचे साम्राज्य आणि पावसात चिखलाने भरलेले रस्ते यामुळे वाहनचालकांचे आणि पादचाऱ्यांचे हाल सुरूच आहेत. विशेषतः रिक्षाचालक आणि गरीब नागरिक यांना या समस्येचा सर्वाधिक फटका बसत आहे.

माजी नगरसेवक रंजीत बनसोडे व भैय्यासाहेब मोरे यांनी स्पष्ट शब्दांत नेत्यांना पत्रकार द्वारे विनंती करत आहेत की, ''सगळे कामे बाजूला ठेवा, पहिला धानोरा रोडचा प्रश्न मार्गी लावा. त्यांनी सांगितले की, या रस्त्यावरील खड्ड्यांमुळे रिक्षा पलटी होण्याचे प्रकार रोजच घडत आहेत. परिणामी आर्थिक नुकसान तर होतेच, पण अनेक अपघातांमुळे नागरिकांच्या जीवावरही बेतत आहे.

रंजीत बनसोडे व नगरसेवक भैय्यासाहेब मोरे यांचे म्हणणे आहे की, धानोरा रोड हा पालवन,धानोरा पुढे अनेक गावांना जोडला जाणारा रस्ता असून ''गरिबांची रोजीरोटी या रस्त्यावर अवलंबून आहे, आणि त्यांचं जीवनच धोक्यात घालणाऱ्या या परिस्थितीकडे प्रशासनाने डोळेझाक केली आहे. नागरिकांमध्ये वाढती अस्वस्थता असून, रस्त्याच्या दुरुस्तीची मागणी प्रबळ होत आहे. स्थानिक प्रशासनाने लवकरात लवकर योग्य पावले उचलून हा रस्ता दुरुस्त न केल्यास तीव्र आंदोलन छेडण्याचा इशाराही स्थानिकांनी दिला आहे.

## गोरगरिबांच्या अतिक्रमणावर हातोडा पण भूमाफियांना पायघड्या



बीड । प्रतिनिधी

दि.०९ शनिवार रोजी नगरपालिका प्रशासनाने बीडमधील वाहतुकीचा अडथळा दूर करण्यासाठी ३ तासात ५० गोरगरिबांच्या अतिक्रमणाच्या नावाखाली पोटावर पाय दिला.उपमुख्यमंत्री अजित पवार बीड दौऱ्यावर आले की नगरपालिकेकडुन शहरातील गोरगरिबांच्या चहाचे हातगाडे, टपरीधारक,छोटे मोठे दुकानदार, फळ विक्रेते,हातावर पोट भरणारे यांचे वाहतुकीस अडथळा ठरणारे अनाधिकृत अतिक्रमणाच्या नावाखाली पोटावर पाय देणारी नगरपालिका बीड शहरातील राखीव असलेल्या शहरातील खुल्या जागा काही अधिकारी आणि कर्मचाऱ्यांच्या संगनमताने हडपण्यात आल्या असुन त्यावर कधी कारवाई करणार तसेच नगरपालिका हद्दीतील ३२ शासकीय कार्यालयांकडे पालिकेचा तब्बल पावणे ३ कोटी रूपयांचा सरकारी कर थकला असुन कधी वसुल करणार असा सवाल सामाजिक कार्यकर्ते डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांनी केला असुन जिल्हा प्रशासन आणि नगरपालिका प्रशासनाच्या विरोधात मंगळवारी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर लक्ष्यवेधी आंदोलन करण्याचा इशारा दिला आहे.


प्लॉटिंग व बांधकाम करताना उद्यान , मंदिरासाठी राखीव असलेल्या शहरातील खुल्या जागा काही अधिकारी आणि कर्मचाऱ्यांच्या संगनमताने भुमाफियांनी गिळंकृत केल्या आहेत. विशेष म्हणजे नगरपालिका, नगररचनाकार, भूमी अभिलेख या तिन्ही कार्यालयातील व्यक्तींच्या मदतीने भूमाफिया आणि नगरपालिकेतील पदाधिकाऱ्यांनी संगनमताने या जागा स्वतःच्या नावावर करून घेतल्या आहेत. बनावट पीटीआर, पीआर कार्ड देखील तयार करण्यात आले आहेत. या प्रकरणी कधी कारवाई करणार असा सवाल डॉ.गणेश ढवळे यांनी केला आहे. बीड नगरपालिका हद्दीतील जिल्हाधिकारी , पोलिस अधीक्षक, महावितरण, जिल्हा न्यायालय, बीएसएनएल , शासकीय कार्यालयांकडे पालिकेचा तब्बल २ कोटी ८७ लाख रुपयांचा कर थकला आहे यात पोलीस अधीक्षक जिल्हाधिकारी कार्यालय अशा प्रमुख कार्यालयांचा समावेश आहे यांच्याकडील थकीत कर नगरपालिका कधी वसुल करणार की केवळ गोरगरीब जनतेवर कारवाई करण्यातच मर्दुमकी गाजवणार असा सवाल डॉ.गणेश ढवळे यांनी विचारला आहे.

## तुळजाभवानी खासबाग देवी मंदिर रोडची दुरावस्था ; भाविकांची मोठी गैरसोय

### जिल्हा प्रशासनासह नगरपालिका प्रशासनाकडून रस्त्याच्या दुरुस्तीची मागणी

बीड । प्रतिनिधी

श्री तुळजाभवानी खासबाग देवी मंदिर बीड शहरा चे ग्रामदैवत आहे. भक्तांच्या हाकेला धावून जाणारी देवी म्हणून ख्याती आहे. बीड जिल्ह्याचा बाहेर जिल्ह्यातील देवीचे भक्तगण दर्शनासाठी येत असतात, मात्र मागील वर्षभरापासून खासबाग देवी मंदिराकडे जाणाऱ्या रस्त्याची अत्यंत दुरावस्था झालेली आहे. वेगवेगळ्या कारणासाठी या मंदिराकडे रस्त्याचे खोदकाम करण्यात आलेले आहे मात्र रस्त्याची दुरुस्ती होत नसल्यामुळे अनेक ठिकाणी खड्डे आहेत. पावसाळ्यामध्ये या खड्ड्यात भाविकांसह परिसरातील नागरिकांना जीव मोठे धरून जावे लागत आहे. जिल्हा प्रशासनासह नगरपालिका प्रशासनाने या



रस्त्याची दुरुस्ती करावी अशी मागणी येणाऱ्या भाविकांसह परिसरातील नागरिकांमधून होत आहे.

बीड शहरातील श्री तुळजाभवानी खासबाग देवी मंदिर ग्रामदैवत आहे. या देवी मंदिरामध्ये दर मंगळवार, शुक्रवार, पौर्णिमा देवी दर्शनासाठी भाविकांचे अलोट गर्दी असते. मंदिराकडे जाणार मुख्य रस्ता कागदी वेस ते खासबाग देवी मंदिर रोड असा आहे. मात्र या रस्त्याची अत्यंत दयनीय अवस्था झालेली आहे. रस्त्यामध्ये अनेक ठिकाणी खड्डेच खड्डे पडलेले आहेत. येत्या दीड महिन्यामध्ये नवरात्र महोत्सवात सुरुवात होणार आहे. नवरात्र काळात देवी दर्शनासाठी पहाटेपासून ते रात्री उशिरापर्यंत भाविक भक्तांची गर्दी असते. त्यामध्ये महिला अबाल-वृद्ध यांची संख्या लक्षणीय असते. नवरात्र काळात अनवणी पायाने चप्पल न घालता दर्शनासाठी येणाऱ्यांची संख्या खूप जास्त प्रमाणात असते. सध्या रोडवर चालणे ही कठीण झालेले आहे.नवरात्र काळात दर्शनाला येणाऱ्या देवी भक्तांचे हेडसाळ थांबवण्यासाठी नवीन रोड होण्याची अत्यंत आवश्यकता आहे. त्यामुळे जिल्हाधिकारी यांनी याप्रकरणी नगरपालिका प्रशासनास निर्देश देऊन या मंदिराकडे जाणाऱ्या मुख्य रस्त्याची दुरुस्ती करावी तसेच नवरात्राच्या पहिले लवकरात लवकर नवीन रस्ता तयार करुन मार्गी लावावा व देवी भक्तांसह परिसरातील नागरिकांची गैरसोय दूर करावी अशी मागणी श्री तुळजाभवानी खासबाग देवी मंदिर देवी भक्त त्यांच्याकडून होत आहे.

## राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षाचा मेळावा पुढे ढकलला

बीड प्रतिनिधी

बीड येथील राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचा नियोजित १३ ऑगस्ट २०२५ रोजीचा मेळावा प्रदेश कार्यालयाच्या सूचनेवरून पुढे ढकलण्यात आला आहे, अशी माहिती राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षाचे जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के यांनी दिली आहे. प्रदेशाध्यक्ष मा. आ. शशिकांत शिंदे व प्रदेश सरचिटणीस आ. श्री. रोहितदादा पवार यांच्या प्रमुख उपस्थिती मध्ये १३ ऑगस्ट २०२५ रोजी बीड जिल्हा कार्यकर्ता मेळावा आयोजित केला होता. परंतु प्रदेश कार्यालयाच्या सूचनेवरून नियोजित कार्यक्रम पुढे ढकलण्यात आला आहे. पुढील कार्यक्रम नंतर कळवण्यात येईल. पदाधिकारी व कार्यकर्ते आदी सर्वांनी नोंद घ्यावी.

## व्यापारी महासंघ महिला आघाडीतर्फे अपंग, अनाथ विद्यालयात रक्षा बंधन

जालना । प्रतिनिधी

व्यापारी महासंघ जिल्हा जालना महिला आघाडी तर्फे अंपग अनाथ निवासी विद्यालयात राखी पौर्णिमा सणा निमित्त तेथील मुलां सोबत रक्षाबंधन कार्यक्रम मराठवाडा विभागीय अध्यक्ष श्री हस्तीमलजी बंब यांच्या अध्यक्षते खाली अति उत्साहात पार पडला. त्यांच्या सोबत मराठवाडा विभागीय महिला सचिव सौ. आनंदी अय्यर, जिल्हा महिला अध्यक्षा सौ. प्रिया जोशी, सौ. जयश्री इंदाणी, प्रमोद जोशी, प्रतिक इंदाणी, मुख्य अध्यापक अभिजित राठोड मंचावर उपस्थित होते. त्या वेळी श्री बंब बोलताना म्हणाले रक्षाबंधन हे बहीण भावाला राखी बांधून मर्यादा मध्ये राहण्याची प्रेरणा देते व भाऊ बहिणीचे सुरक्षेची हमी देतो. येथील विद्यालयात ज्या मुलांचे आई-वडील, भाऊ, कुटूंब नाही व अंपग, विकलांग, दिन दुःखी अनाथ मुले आहे. खर तर या उलट आमची महिला संघटना येथील गरंजु मुलांसाठी त्यांचा उत्साह वाढविण्यासाठी, मदत करण्यासाठी गोर गरीब मुलांच्या सुरक्षेची हमी घेण्यासाठी येथे आले आहे.

सौ. जोशी, सौ. अय्यर, सौ. इंदाणी यांचे कार्य अनाथाचे नाथ सारखे प्रेरणा देणारे आहे. या महिलांनी



जिल्ह्यातील सर्व तालुक्यात गावा-गांवात जाऊन उद्योग, गृह-उद्योग, व्यवसायात महिलांना एकजुट करून महिलांची संघटना उभारली आहे. त्याच सोबत सामाजिक सेवाभावी कार्यात अग्रसर आहे, त्यामुळे उत्कृष्ठ कार्या बदल महिला आघाडीला नुकतेच पुरस्कार सुद्धा देण्यात आले आहे. बेसहारांना सहारा देणे हे महान कार्य आहे. मुलांनो जिद चिकाटी, लग्न अभ्यासाने पुढे जाऊन आपले स्वप्न साकार करा. युवक विद्यार्थी समाजाचे, देशाचे, राष्ट्राचे भावी निर्माते आहे. त्यांच्या भविष्यासाठी त्यांना मदत करणे, उत्साह वाढविणे आमचे कर्तव्य आहे असे बंब म्हणाले. सौ. जोशी प्रस्ताविक करताना कुटुंबाच्या अगोदर आम्ही येथे अंपग अनाथ मुलां सोबत रक्षाबंधन सण साजरा करताना आमचे मन भर-भराऊन गेले आहे. माझ्या गृह उद्योगात सेकडो गरजु महिलांना रोजगार देण्यात आले आहे. सौ. अय्यर म्हणाले स्वतः साठी, कुंटुबासाठी कोणीही करतात पण ज्याचे कोणी वाली नाही अशा गरजू मुलांसोबत राखी सण साजरा करीत असताना आनंद व समाधान मिळत आहे, कॉम्प्युटर क्लासेस सेंटर चालवितांना हजारो युवक-युवतींचा भविष्य घडविण्यात आले आहे, असे अय्यर म्हणाले. सौ. इंदाणी माझा लहान भाऊ सुध्दा अपंग होता मागील महिन्यात त्यांचे दुःखद निधन झाले आहे एकच भाऊ होता म्हणून मी येथे अनाथ मुलासोबत रक्षाबंधन सण साजरा करताना तुम्हीच सर्व माझे सखे भाऊ आहात. शाळेतील ४८ मुलांना महिलांनी राखी बांधुण सण साजरा केला. त्याच बरोबर मुलांना मिठाई, फरसान, खेळणी अनेक शाळेय शैक्षणिक साहित्य श्री बंब यांच्या हस्ते वाटप करण्यात आले.

## बीडमध्ये १७ ऑगस्टला राज्यस्तरीय लहान मुलांचा फॅशन शो

### चला हवा येऊ द्या सेलिब्रिटींच्या उपस्थितीत रंगणार भव्य सोहळा

बीड । प्रतिनिधी

देवगिरी प्रतिष्ठान, संचलित तुलसी कॉलेज ऑफ फॅशन डिझाईन, बीड यांच्या वतीने राज्यस्तरीय लहान मुलांचा फॅशन शो चॅम्प ऑन रॅम्प २०२५' हा भव्य कार्यक्रम रविवार, दि.१७ ऑगस्ट २०२५ रोजी सकाळी ११ वाजता बीड येथील रामकृष्ण लॉन्स, कॅनॉल रोड, शाहूनगर, बीड येथे आयोजित करण्यात येणार आहे. या कार्यक्रमाचे मुख्य आकर्षण म्हणजे 'चला हवा येऊ द्या' या लोकप्रिय टीव्ही कार्यक्रमातील सेलिब्रिटी पाहुण्यांची विशेष उपस्थिती, जी संपूर्ण कार्यक्रमात विशेष आकर्षण ठरणार आहे. कार्यक्रमात राज्यभरातील विविध फॅशन डिझायनिंग कॉलेजांमधील विद्यार्थी-डिझायनर्सना स्वतः डिझाइन केलेल्या पोशाखांचे सादरीकरण करण्याची संधी दिली जाणार असून, या पोशाखांचे सादरीकरण ३ ते १५ वयोगटातील बाल कलाकार रॅम्पवर मॉडेल्सच्या रूपात करणार आहेत.

स्पर्धा तीन गटांत होणार असून पहिला गट ३ ते ६ वर्षे, दुसरा गट ७ ते ११ वर्षे आणि तिसरा गट १२ ते १५ वर्षे असा असेल. सर्व सहभागी बालक व डिझायनर्सना ट्रॉफी, प्रमाणपत्र, प्रोफेशनल फोटोशूट आणि दोन मोफत प्रवेश पास देण्यात येतील. याशिवाय 'बेस्ट चॅम्प ऑन रॅम्प' आणि 'बेस्ट डिझायनर' या पुरस्कारांसाठी प्रथम, द्वितीय आणि तृतीय क्रमांकांचे सन्मान दिले जातील. नोंदणी शुल्क ₹७०० असून जागा मर्यादित आहेत. इच्छुकांनी नोंदणीसाठी ९३१०६६६६५२ किंवा ९९७५९९४५१२ या क्रमांकांवर संपर्क साधावा किंवा पोस्टरवरील क्यूआर कोड व ऑनलाईन लिंक वापरावी. बालक व डिझायनर्ससाठी स्वतंत्र नोंदणी लिंक व क्यूआर कोड उपलब्ध असून, आपल्या श्रेणीनुसार योग्य पर्याय वापरावा. पालकांनी आपल्या मुलांची त्वरित नोंदणी करून त्यांना फॅशन रॅम्पवर झळकण्याची संधी द्यावी, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

## एकोप्याने आनंदाने जगा हा संत भगवान बाबांचा संदेश- डॉ.नाना महाराज

बीड । प्रतिनिधी

देवाच्या दारात जाण्यासाठी सेवा दारवांटा आहे. दास्य भक्तीचा सर्वोच्य आदर्श रामायणात हनुमंतराय आहेत. अशा प्रतिपादन श्री ह भ प रोहिणी ताई परांजपे यांनी केले. धारूर तालुक्यातील चारदरी येथील जागरण हनुमान मंदिर या ठिकाणी तिसऱ्या श्रावण शनिवारी आयोजित कीर्तन सोहळा त्या बोलत होत्या.. यावेळी प्रमुख उपस्थिती श्री ह भ प डॉ.सुदाम महाराज पानेगावकर, श्री ह भ प डॉ नाना महाराज कदम, श्री ह भ प विठ्ठल महाराज आंधळे शास्त्री, श्री ह भ प सुरेश महाराज जाधव.श्री ह भ बाबा महाराज मुंडें, शिवाजी तोंडे सर यांच्या सह हजारो भावी भक्तांची उपस्थिती होती.. धारूर तालुक्यातील श्रीक्षेत्र चारदरी येथे जागृत हनुमान मंदिरात दुसऱ्या श्रावण शनिवारी गेल्या १९ वर्षापासून तोंडे कुटुंब ज्ञानदान व अन्नदानाचे सेवा करत आहे.

यावर्षी महाराष्ट्रातील सुप्रसिद्ध कीर्तनकार कीर्तन चंद्रिका सुनीताई परांजपे यांचे कीर्तन



संपन्न झाले. यावेळी त्यांनी संत ज्ञानेश्वर महाराजांच्या तुझी सेवा करीन मी मनोभावें वो । माझें मन गोविंदीं रंगलें वो ।।१।। नवसिये नवसिये माझे नवसीयेवो ।। पंढरिचे दैवते विठ्ठले नवसिये वो ।।२।। बापरखुमादेवीवरे विठ्ठले वो । चित्तीं चैतन्य चोरुनि नेलें वो ।।३।। या अभंगावर सुंदरचिंतन मांडले यावेळी बोलताना रोहिणी ताई यांनी देवाच्या दारात जाण्यासाठी सेवा दारवांटा त्यामुळे सेवा करणं महत्त्वाचं चार्जर येथील हनुमान मंदिराची सेवा केली तर त्याचे फळ मिळतेच. सामान्य जीव देवाकडे सर्व गोष्टी मागतात मात्र देवाकडे देव मागत नाही. संत हे देवाकडे देवालाच मागतात. अध्यात्म कीर्तन वारकरी परंपरा यात वारकरी संतांनी समतेची दृष्टी दिली. संत ज्ञानेश्वर महाराजांनी भावार्थदीपिका ही गीतेवरील टीका केली.भाव हा भक्तीचा अलंकार आहे.माणसाचा देव झाला पाहिजे.यासाठी अध्यात्म आहे. संताना अपेक्षित समाज घडण महत्वाच आहेत. असं चिंतन रोहिणी ताई यांनी मांडलं. कीर्तनानंतर सामाजिक क्षेत्रात काम करणारे डॉक्टर सुदाम महाराज पानेगावकर यांना समाजभूषण म्हणून गौरविण्यात आले.. तर लिहावा प्रा. डॉ नाना महाराज कदम यांना अध्यात्म भूषण पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. कीर्तनानंतर उपस्थित हजारो जनसमुदायाला बुंदी ,चपाती ,भात भाजी ,अशा महाप्रसादाचे वाटप करण्यात आले. यावेळी मंदिर परिसरात मोठ्या पंक्ती बसल्या होत्या हजारोच्या पंखेला वाढण्याचे काम चार्जर येतील तरुण मंडळांनी केले. या संपूर्ण कार्यक्रमाचे आयोजन शिवाजी तोंडे यांचे दोन्ही मुल भारत तोंडे आणि मोहन तोंडे यांनी केले होते.

## पाटोदा झेडपी शाळेत रक्षाबंधन

मंठा : बहिण भावाचा पवित्र रक्षाबंधन सण ९ ऑगस्ट रोजी शनिवारी आनंददायी उपक्रमांतर्गत जिल्हा परिषद प्राथमिक शाळा व पीएमश्री जिल्हा परिषद प्रशाला पाटोदा येथे साजरा करण्यात आला. विद्यार्थिनींनी स्वतः राखी निर्मिती करून विद्यार्थ्यांना बांधली. यासाठी मुख्याध्यापक प्रकाश टोम्पे, संतोष तोटेवाड, अनुजा पाटील, गीता बरसाले, देविदास मामीलवार आणि गंगाधर वानोळे आदी शिक्षकांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. ग्रंथालयातील अवांतर पुस्तक वाचन करीत कबड्डीसह खो खो व हॉकी या भारतीय खेळाचीही माहिती विद्यार्थ्यांनी घेतली.



# पिंपळवंडी शिवारात बिबट्यांचा धुमाकूळ; एका शेळीचा घेतला बळी

## रानडुकराकडून पिके उद्ध्वस्त तर बिबट्यांचे पाळीव जनावरांवर हल्ले,शेतकऱ्यांसाठी दुहेरी संकट

पिंपळवंडी । प्रतिनिधी

पाटोदा तालुक्यातील पिंपळवंडी व शिरूर तालुक्यातील पांगरी, जाटनांदुर, खोपटी परिसरामध्ये बिबट्यांचा मोठ्या प्रमाणात संचार वाढला असून शेतकऱ्यांच्या पशुधनावर,त्यामध्ये बैल,गाय,वासरे व शेळ्यावर हल्ले करून जखमी व ठार करण्याच्या घटना सतत घडू लागल्याने परिसरातील पशुधन पालकांमध्ये घबराटीचे व भीतीचे वातावरण निर्माण झाले असून वन विभागाने बिबट्याचा तात्काळ बंदोबस्त करून शेतकऱ्यांना सहकार्य करावे,अशी परिसरातील शेतकऱ्याकडून अपेक्षा व्यक्त केली जात आहे.



पिंपळवंडी येथील शेतकरी अशोक बाजीराव पवार हे नेहमी प्रमाणे कुंभारदारा शेत शिवारात दि.९/८/२०२५ रोजी शेळ्या चारण्यासाठी गेले असता दुपारी २:३० वाजण्याच्या सुमारास बिबट्याने अचानक एका शेळीवर हल्ला केला, त्या हल्ल्यात शेळी जागेवरच गतप्राण झाली.त्यामुळे अशोक पवार यांचे ३० हजाराचे आर्थिक नुकसान झाले आहे. याबद्दल त्यांनी वनविभागाला अर्ज देऊन कळविले आहे.याबद्दल त्यांना आर्थिक नुकसान भरपाई मिळावी अशी अनेकांनी अशा व्यक्त केली आहे.पाटोदा तालुक्यातील पिंपळवंडी, जरेवाडी, बेदरवाडी, सरदवाडी, चंद्रेवाडी,धोपटवाडी, डोंगरकिन्ही, खोपटी,पांगरी हा डोंगरपट्ट्याचा परिसर असून या परिसरात बिबट्याची संख्या वाढत चालली असून ही संख्या अशीच वाढत राहिली तर,शेतकऱ्यांपुढे मोठा प्रश्न निर्माण होऊन जनावरे बिबट्याच्या हल्ल्यापासून कसे पान ३ वर

# घोरपडीची तस्करी वाढली

## शहरातील हॉटेल ढाब्यांवर विक्री

आष्टी । प्रतिनिधी

५०० ते १००० रुपयांपर्यंत एका घोरपडीची विक्री: आष्टी तालुक्यातील डोंगराळ

भागात खेडोपाडी घोरपडीची शिकार केल्यांनतर तिचे हातपाय बांधून हॉटेल व ढाब्यावर तिची विक्री केली जात असल्याने घोरपडीचे अस्तित्व धोक्यात आले आहे. या प्रकरणी कारवाई करावी, अशी मागणी प्राणिमित्रांनी केली आहे.

आष्टी तालुक्यातील ग्रामीण भागात घोरपडींची संख्या अधिक असल्याने तस्करीचे प्रकार समोर येत आहेत. ५०० ते १००० रुपयांपर्यंत एका घोरपडीची विक्री होत असल्याचे दिसत आहे. घोरपडीच्या तस्करी व विक्रीवर बंदी

असली तरी ग्रामीण भागात घोरपडीची विक्री खुलेआम होत आहे. तालुक्यातील डोंगराळ भागात काही लोक घोरपडीला पकडून तिचे हात-पाय बांधतात. त्यानंतर घोरपडीची हॉटेल व



ढाबाचालकास खुलेआम विक्री करत आहेत. या प्रकरणी तस्करी करणाऱ्यांवर कायदेशीर कारवाई करावी, अशी मागणी कडा येथील प्राणिमित्र नितीन आळकुटे यांनी केली आहे.

तस्करी करणे हा गुन्हाच

भारतीय वन्यजीव संरक्षण अधिनिय १९७२ च्या कलमानुसार घोरपडीची तस्करी करणे, हा कायद्याने गुन्हा अन सध्या याकडे वन विभाग व पोलिसांच लक्ष नसल्याचे पान ३ वर

# स्व.बाबुरावजी आडसकर यांच्या पुण्यतिथी निमित्त आडस येथे रक्तदान शिबीर

केज । प्रतिनिधी

सत्तरच्या दशकातील केज, अंबाजोगाई तालुक्यातील सहकार, शिक्षण क्षेत्राच्या माध्यमातून विकासाची गंगा खेचुन आणणारे लोकनेते माजी आमदार स्व.बाबुरावजी आडसकर यांच्या कामाच्या माध्यमातून अजुनही शेतकरी, शेतमजूर यांच्या मनात कायम स्मृती आहेत.त्यांचा हाबाडा हा शब्द संपुर्ण महाराष्ट्रात गाजला होता.

लोकनेते माजी आमदार स्व. बाबुरावजी आडसकर



यांच्या नवव्या पुण्यतिथी निमित्त दि.१२/८/२०२५ मंगळवारी छत्रपती शिवाजी विद्यालय आडस या ठिकाणी सकाळी नऊ वाजता सर्व रोग निदान व रक्तदान शिबीर होणार असुन सकाळी अकरा वाजता ह.भ.प.भगवान महाराज वरपगांवकर यांचे पुण्यतिथी निमित्त किर्तन होणार आहे अशी माहिती अंबा सहकारी कारखाना, अंबाजोगाई चे चेअरमन रमेशराव आडसकर यांनी दिली आहे.

या सर्व कार्यक्रमांना व महाप्रसादासाठी केज , अंबाजोगाई,धारूर, वडवणी व माजलगाव तालुक्यातील सर्वांनी उपस्थित राहण्याचे आवाहन रमेशराव आडसकर व ऋषीकेश आडसकर यांनी केले आहे.

# तांदळा येथे जागतिक आदिवासी गौरव दिन साजरा



गेवराई । प्रतिनिधी

तालुक्यातील तांदळा येथे दि, ९ ऑगस्ट शनिवारी रोजी एकलव्य जयंती जागतिक आदिवासी गौरव दिन व एकलव्य चौकाचे उदघाटन केले, यावेळी तांदळा गांवकरी व एकलव्य संघटनेची मावळे उपस्थित होते,

तांदळा ग्रामपंचायत मध्ये जागतिक आदिवासी गौरव दिन एकलव्य जंयती साजरी करण्यात आली, यावेळी संरपंच नवनाथ गवते, बाळु माळी, पत्रकार संतोष भारती, गहिनीनाथ हाकाळे, जिजा सिरसट सह कोळगांव व तांदळा येथिल एकलव्य संघटनेची कार्यरते मोठ्या संख्येने उपस्थित होते, यावेळी संरपंच नवनाथ गवते, बाळु माळी, गहिनीनाथ हाकाळे यांनी एकलव्य यांच्या कार्याचा उजाळा दिला, एकलव्य यांनी दोर्णाचार्याचा पुतळा समोर उत्कृष्ट धनुर्धारी विद्याचे धडे घेत उत्कृष्ट धनुर्धारी म्हणून ज्ञान मिळाले, हेच कला समाजाला अवगत झाल्याने, त्यांना अचुक नेम साधता येतो, त्यामुळे सन १९९४ पासुन एकलव्य जंयती दिवशी जागतिक गौरव दिन म्हणून साजरा होत आहे, या दिवशी कार्यक्रमाचे निमीत्ताने येथे एकलव्य चौकाचे उदघाटन गांवचे प्रतिष्ठात नागरीक गहिनीनाथ बापु यांच्या हस्ते श्रीफळ फोडुन चौकाचे उदघाटन केले.

# तिसरा श्रावणी सोमवारनिमित्त आज आष्टीत गोविंद महाराज यांचे कीर्तन

आष्टी । प्रतिनिधी

आष्टी येथील सावतानगर बेलेश्वर महादेव मंदीर आवारात





तिसरा श्रावणी सोमवार निमित्त आज सोमवार दि.११ आगस्ट रोजी सकाळी १० ते १२ यावेळेत ह.भ.प. गोविंद महाराज पवार सर यांचे कीर्तन होणार आहे.बेलेश्वर सेवा मंडळाचेवतीने कीर्तन व भंडारा प्रसाद आयोजित करण्यात आले आहे.संगीत विशारद रविंद्र तवले महाराज,ह.भ.प. उत्तम महाराज धोंडे,ह.भ.प.सोपान काका पोकळे, ह.भ.प.लाला महाराज राक्षे,ह.भ. प.रोहित महाराज वडेकर,विणेकरी ह.भ.प.छगन महाराज कारंडे, ह.भ.प.बलभीम तात्या धोंडे तर चोपदार साहेबराव ग्यानदेव धोंडे,सुनिल रघुनाथ धोंडे हे काम पाहणार आहेत. कीर्तनानंतर भंडारा होणार आहे.

# अल्पवयीन मुलीस पळवणाऱ्या दोघांना पकडले

जालना । प्रतिनिधी

१६ वर्षी मुलीला पळून नेल्याप्रकरणी चंदनझिरा पोलीस ठाणे व उत्तर प्रदेश पोलीसांनी दोघांना पकडले सदरील कारवाई चंदनझिरा भागात केली.

पोलीस ठाणे कोतवाली जिल्हा मैनपुरी आग्रा विभाग राज्य उत्तर प्रदेश येथे दिनांक ०९/०७/२०२५ रोजी गु.र.नं. ५०६/२०२५ कलम १३७(२),३७ भा. न्या. संहिता २०२३ नुसार फिर्यादी ध्रुव सिंह लखन सिंह पोलीस उपनिरीक्षक पोलीस लाईन मैनपुरी राज्य उत्तर प्रदेश यांनी त्यांची अल्पवयीन मुलगी ही आरोपी आयाज अन्सारी , मकसूद अन्सारी ,फैजान अन्सारी



सर्व रा. गोलाबाजार मैनपुरी यांनी १६ वर्ष अल्पवयीन मुलीस फुस लावुन बळजबरीने पळवुन नेल्याचे गुन्हा दाखल केला होता. उत्तर प्रदेश येथील कोतवाली पोलीस ठाणे व चंदनझिरा पोलीस स्टेशनचे पोउपनि/ मारियो स्कॉट व टिम यांनी वरिष्ठांच्या मार्गदर्शाखाली गुन्ह्याचे गांभिर्य ओळखुन चंदनझिरा भागात बातमीदार नेमुन खात्रीशीर माहिती प्राप्त करून अत्यंत गुप्त पद्धतीने नियोजनबध्दरित्या आरोपींचा मार्ग काढत गुन्ह्यातील आरोपी फैजान मकसूद अन्सारी, आयाज मकसूद अन्सारी रा. गोलाबाजार मैनपुरी राज्य उत्तर प्रदेश यांना चंदनझिरा भागात ताब्यात घेवुन व त्यांच्याकडे गुन्ह्याबाबत सखोल चौकशी करुन पोलीस खाक्या दाखवुन त्यांच्यासोबत फुस लावुन पळवुन आणलेल्या १६ वर्ष वय असलेल्या अल्पवयीन मुलीचाही शोध लावला. पुढील योग्य त्या कायदेशीर कार्यवाही कामी दोन्ही आरोपी व अल्पवयीन मुलीस कोतवाली पोलीस ठाणे मैनपुरीचे पोलीस उपनिरीक्षक श्री. दिनेश कुमार यांच्या ताब्यात देण्यात आले.सदरची कामगिरी ही मा. पोलीस अधीक्षक श्री. अजय बंन्सल, मा. अप्पर पोलीस अधीक्षक श्री. आयुष नोपाणी, मा. उपविभागीय पोलीस अधिकारी श्री. अनंत कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिसांनी कारवाई केली





# खंडेश्वरी मंदिर परिसरातील ऐतिहासिक बारव की कचऱ्याचा डेपो

बीड शहरापासून जवळच ऐतिहासिक खंडेश्वरी मंदीर आहे. या मंदिरासमोरच पुरातन काळातील ऐतिहासिक बारव आहे. या ठिकाणी नेमके पाणी कोठून येते आणि कोठे जाते याचे रहस्य अद्याप उलगडलेले नाही. हा ऐतिहासिक ठेवा जपून ठेवणे ही नगरपालिकेसह पुरातत्त्व खात्याची जबाबदारी असताना या ठिकाणी मोठमोठे कचऱ्याचे ढीग टाकले जात आहेत. त्यामुळे आता या ऐतिहासिक बारवेला कचऱ्याच्या डेपोचे स्वरूप प्राप्त झाले आहे. नगरपालिकेने या ठिकाणी टाकलेला कचरा उचलून याची दुसरीकडे विल्हेवाट लावावी अशी मागणी इतिहास प्रेमी नागरिक करत आहेत. बीड शहरातील कचरा मोठ्या प्रमाणात खंडेश्वरी परिसरात टाकला जात आहे. या ठिकाणी नवरात्र उत्सवात देवीच्या दर्शनासाठी सिमेंटचा रस्ता तयार करण्यात आला होता. या रस्त्याची दुर्दशा झाली असून आता हा रस्ता बंद करण्याचा घाट नगरपालिकेने शहरातील सर्व कचरा टाकून घातला आहे. या कचऱ्याची जबाबदारी नगरपालिका झटकत आहे.

# जितेंद्र भोपळे यांची महाराष्ट्राच्या नगररचना संचालकपदी नियुक्ती

बीड । प्रतिनिधी

मराठवाड्याचे रहिवासी असलेले जी-तेंद्र भोपळे यांची महाराष्ट्र राज्याच्या पुणे येथील नगररचना संचालकपदी नियुक्ती करण्यात आली आहे, जे विभागाचे राज्यस्तरीय सर्वोच्च पद आहे. विभागात त्यांच्या दीर्घ सेवेदरम्यान, त्यांनी मुंबईतील महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ (एमएसआरडीसी) चे संचालक (नगररचना) म्हणून यापूर्वी अनेक ठिकाणी काम केले.



बीड जिल्ह्यातील गेवराई तालुक्यातील मादलमोही गावातील रहिवासी असलेले भोपळे यांनी १९९३ मध्ये छत्रपती संभाजीनगर येथे सहाय्यक नगररचनाकार म्हणून आपल्या कारकिर्दीची सुरुवात केली. गेल्या तीन दशकांमध्ये त्यांनी सहाय्यक संचालक, उपसंचालक आणि सहसंचालक, नगररचना यासह विविध प्रमुख भूमिकांमध्ये काम केले आहे. बीड, मीरा-भाईंदर, ठाणे, पुणे, मुंबई, उल्हासनगर आणि कोकण प्रदेश यासारख्या शहरांमध्ये त्यांचा प्रचंड अनुभव आहे. नवीन महाबळेश्वर-युद्ध पर्यटन विकास योजनेच्या तयारीत भोपळे यांनी महत्त्वाची भूमिका बजावली. भोपळे हे वक्तशीर, प्रामाणिक, समर्पित, शिस्तबद्ध, कार्यक्षम आणि विनम्र अधिकारी म्हणून ओळखले जातात. त्यांनी ६ ऑगस्ट रोजी पुणे येथे आपल्या पदाचा कार्यभार स्वीकारला. विभागातील अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी त्यांचे उत्साही स्वागत केले.

# जनआक्रोश आंदोलनात शिवसैनिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे-वरेकर

बीड । प्रतिनिधी

पक्षप्रमुख उद्धवसाहेब ठाकरे यांच्या आदेशानुसार व शिवसेना सचिव विनायक राऊत, संपर्कनेते सुनिल प्रभू, विरोधी पक्षनेते अंबादास दानवे व संपर्कप्रमुख परशुराम जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली येत्या सोमवार रोजी सकाळी ११ वाजता भ्रष्टाचारी व कलंकीत मंत्र्यांना हाकला , व इतर अनेक मागण्यांसाठी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे बीड जिल्हा पक्षाच्या वतीने बीड शहरातील अण्णाभाऊ साठे चौकात शिवसेना जिल्हाप्रमुख गणेशभाऊ



वरेकर यांच्या नेतृत्वाखाली जन अक्रोश आंदोलन करण्यात येणार आहे तरी सर्व पदाधिकारी, महिला आघाडी, युवा सेना,व शिवसैनिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे असे आवाहन जिल्हाप्रमुख गणेशभाऊ वरेकर , माजी जिल्हाप्रमुख परमेश्वर सातपुते सर, महिला आघाडीच्या जिल्हा संघटिका प्रमिलाताई माळी, तालुकाप्रमुख गोरख अण्णा सिंघन बीड, तालुकाप्रमुख विनायक बप्पा मुळे वडवणी , तालुकाप्रमुख बाबा सराफ धारुर यांनी केले आहे

# शेंडाळा शाळेत वृक्षांना राखी बांधून पर्यावरणपूरक रक्षाबंधन साजरे

म्हसोबावाडी । प्रतिनिधी

जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, शेंडाळा येथे रक्षाबंधनाचा सण यंदा वेगळ्या पद्धतीने साजरा करण्यात आला. बहीण-भावाच्या पवित्र नात्याचे प्रतिक असलेल्या या सणाला पर्यावरणाची जोड देत विद्यार्थ्यांनी वृक्षांना राखी बांधून त्यांचे रक्षण करण्याची शपथ घेतली. या उपक्रमातून ''झाडे लावा, झाडे वाचवा'' हा संदेश गावकऱ्यांपर्यंत पोहोचवण्यात आला.

कार्यक्रमाची सुरुवात



शाळेच्या प्रांगणातील मोठ्या व लहान वृक्षांना विद्यार्थ्यांनी रंगीबेरंगी राख्या बांधून झाली. यावेळी मुलांनी व मुलींनी ''वृक्ष हेच आपले बंधू आहेत, ते आपल्याला सावली, ऑक्सिजन आणि फळे देतात, तसेच पावसाचे प्रमाण व पर्यावरणाचे संतुलन राखतात. म्हणून त्यांचे रक्षण करणे आपले कर्तव्य आहे,'' असा ठाम संदेश दिला. मुख्याध्यापक पान ३ वर

# प्रतिकूल परिस्थितीमध्ये सर्वगुणसंपन्न विद्यार्थी घडवण्याचे कार्य कौतुकास्पद -मिराताई गांधले

वडवणी । प्रतिनिधी

आज ९ ऑगस्ट हा सर्वत्र जागतिक आदिवासी दिन म्हणून,मोठ्या उत्साहामध्ये साजरा करण्यात येत आहे.ज्या आदिवासी समाज बांधवांच्या संस्कृतीने,त्यांच्या चाली-रीती,रूढी-परंपरा या पर्यावरणास पूरक अशा आहेत. पर्यावरणाचा खऱ्या अर्थाने, समतोल राखण्याचं काम समस्त आदिवासी बांधव करत आहेत. त्यांच्या कलेनुसार, कलाविष्कारांचा,संस्कृतीचे जतन व्हावे म्हणून आदिवासी दिन हा




साजरा करण्यात येतो.त्या निमित्ताने शासकीय माध्यमिक आश्रम शाळा थेटेगव्हाण ता. धारूर जि.बीड येथे जागतिक आदिवासी दिनाच्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.शाळेचे मुख्याध्यापक श्री सखाराम वनवे सर शाळेतील शिक्षक व शिक्षक इतर कर्मचारी यांच्या मार्गदर्शनाखाली शाळेमध्ये जागतिक आदिवासी दिनाचे आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी विद्यार्थ्यांना आणि समस्त पालक वर्गांना मार्गदर्शन करताना प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित असलेल्या जिल्हा परिषद च्या माजी अध्यक्ष श्रीमती मीराताई गांधले यांनी वरील उद्गार काढले तर अध्यक्षीय भाषणा तून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना शाळेचे मुख्याध्यापक श्री सखाराम वनवे सर यांनी आदिवासी समाजाने आता शिक्षणरूपी असलेल्या अज्ञानाशी बंड पुकारावे असे आव्हान उपस्थित विद्यार्थी आणि पालकांना केले केले प्रथम व्यासपीठावरील प्रमुख अतिथी मीराताई गांधले शाळेचा माजी विद्यार्थी एव्हरेस्ट वीर सुग्रीव मंदे शाळेचे मुख्याध्यापक,समस्त पालक या सर्वांच्या हस्ते दीप प्रज्वलन करून,सर्व आदिवासी क्रांतिकारकांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली.याप्रसंगी शाळेतील विद्यार्थी,श्यामबाला वाकतकर रेखा अंभोरे पूजा साबळे आदी पान ३ वर



बीड : शहरातील भाजीमंडई भागात असलेल्या जिव्हाळा शहरी बेघर निवारा केंद्रात अनेक बेघर महिला राहतात. राखीपौर्णिमेच्या निमित्ताने पोलीस निरीक्षक राजू गुळभिले यांनी सहकुटूंब जावून प्रत्येक महिलेला साडी-चोळी देवून आणि ओवाळणी देवून रोखी पौर्णिमा साजरी केली. या महिलांकडून गुळभिले यांनी राखी बांधून घेतली. यामुळे या बेघर निर्वासित महिलांच्या चेहऱ्यावर हास्य फुलले. पोलीस दलात नोकरी करणाऱ्या राजू गुळभिले यांनी कायमच सामाजिक बांधिलकी जपलेली आहे. याठिकाणी असलेल्या जवळपास २० महिलांना त्यांनी साडीचोळी दिली.

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Subhash vilasrao choure. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

# पोलीस अधिकाऱ्यांवर कारवाई न झाल्यास तीव्र आंदोलन करू -छावा

पिंपरी चिंचवड । प्रतिनिधी

शेतकऱ्यांच्या जीवावर उठलेल्या, मग्रुर मदमस्तवाल पोलीस अधिकारी बालाजी पांढरे यांच्यावर पोलिस आयुक्तांनी कडक कारवाई करावी अन्यथा छावाच्या वतीने तीव्र आंदोलन करण्यात येईल तेव्हा संबंधित अधिकाऱ्यावर कारवाई करावी अशी मागणी अखिल भारतीय छावा संघटनेने केली आहे.



हिंजवडी पांडवनगर या ठिकाणी दि. ०७/०८/२०२५ रोजी साधारण दुपारी २ ते ३ चे दरम्यान शेतकरी बांधव, पी एम आर डी चे अधिकारी तसेच स्थानिक नागरिक हे राष्ट्रवादी अजितदादा पवार गटाचे आमदार शंकर मांडेकर अतिक्रमणाबाबत चर्चा करीत असताना त्यांचे समक्ष हिंजवडी पोलिस स्टेशनचे वरिष्ठ पी. आय बालाजी पांढरे यांनी सदर चर्चेमध्ये खंड पाडून काही शेतकरी बांधव यांना धक्काबुकी करुन शिवीगाळ करणेस सुरुवात केली. सदर वरिष्ठ पी आय यांच्या या कृत्यास उपस्थित असलेले सर्व नागरिक यांनी विरोध केला असता त्यांनी पोलिस बळाचा गैरवापर करुन सदरील सामान्य शेतकरी बांधव व नागरिकांचा आवाज दाबण्याचा प्रयत्न केला.

शेतकरी यांच्या हक्कासाठी व न्यायासाठी त्या ठिकाणी जमले होते. सविस्तरपणे चर्चा देखील सुरू होती. त्यावेळी या ठिकाणी शेतकरी बांधव तसेच राष्ट्रवादी अजितदादा पवार गटाचे आमदार शंकर मांडेकर, पी एम आर डी चे अधिकारी तसेच स्थानिक नागरिक देखील मोठ्या प्रमाणात उपस्थित होते. शांतपणे चर्चा सुरू असताना हिंजवडी पोलिस स्टेशनचे वरिष्ठ पी. आय बालाजी पांढरे यांनी चर्चेत सहभागी होण्यासाठी बोलवले असता त्यांनी त्यांनी अत्यंत खालच्या भाषेत आणि शिवराळ भाषा वापरली. त शिवीगाळ केली एवढ्यावरच थांबले नाहीत. तर बाहेर हकण्याचा पराक्रम केला वरिष्ठ पी. आय बालाजी पांढरे न थांबता शेतकरी व स्थानिक नागरिकांची काहीही चुकी नसताना ते म्हणाले, घ्या रे यांना ताब्यात, तुम्हाला मस्ती आली आहे काय मस्ती करायची नाय, पोलिसाना ओढता का काय रे, त्यांच्या अंगाला हात देखील लावला नसताना त्यांनी बनाव करत म्हणाले माझ्या अंगाला हात का लावला त् अशा मग्रुर, शेतकऱ्यांच्या जीवावर उठलेल्या, मदमस्तवाल पोलीस अधिकारी बालाजी पांढरे यांच्यावर कडक कारवाई करून सदरील घटनेचा पारदर्शी चौकशी करुन दोषी पोलिस कर्मचाऱ्यांवर योग्य ती कडक कारवाई करण्यात यावी, तसेच सदरील घटनेचा अखिल भारतीय छावा संघटनेतर्फे तीव्र स्वरुपात निषेध करणेत येत आहे.

संबंधीत घटनेतील दोषींवर कारवाई न झालेस अखिल भारतीय छावा संघटने मार्फत तीव्र स्वरुपाचे आंदोलन करणेत येईल. अशी माहिती आयोजित केलेल्या पत्रकार परिषदेत देण्यात आली. यावेळी अखिल भारतीय छावा मराठा युवक संघटनेचे मनोज आण्णा मोरे प्रदेश महासचिव, मच्छिद्र चिंचोळे पश्चिम महाराष्ट्र अध्यक्ष, अक्षय बोडके - पुणे जिल्हा अध्यक्ष, प्रशांत फड, शिक्षक आघाडी पुणे जिल्हा अध्यक्ष, सचिन लिमकर पश्चिम महाराष्ट्र उपाध्यक्ष आणि अन्याय ग्रस्त शेतकरी बांधव उपस्थित होते.

# वरवंड खून प्रकरणातील आरोपींना दोन दिवसांत अटक

खोर: वरवंड (ता. दौंड) हद्दीत एका ३३ वर्षीय युवकाचा विटा व सिमेंटच्या मिक्सरच्या तुकड्याने डोक्यावर प्राणघातक वार करून खून करण्यात आला होता. याप्रकरणी पोलिसांनी दोन दिवसांत तपासाचा छडा लावून दोन आरोपींना अटक केली आहे.



वरवंड (ता. दौंड) परिसरातील पुणे- सोलापूर हायवेलगत असलेल्या पडीक जमिनीत शैलेंद्रकुमार सुशीलकुमार विमल (वय ३३, मूळगाव- जमोहना, ता. भानपूर बाबु, जि. बस्ती, उत्तर प्रदेश; सध्या रा. वरवंड वरसगाव) यांचा मृतदेह आढळला. अज्ञात आरोपींनी अज्ञात कारणावरून त्यांच्या डोक्यात विटा व सिमेंटच्या मिक्सरचा तुकडा मारून खून केला होता.ही घटना मंगळवारी (दि. ५) सायंकाळी साडेपाच वाजता घडली होती. ही घटना बुधवारी (दि. ६) सकाळी पावणेआठच्या सुमारास उघडकीस आली होती. गुन्हा दाखल झाल्यानंतर यवत पोलिस ठाणे, स्थानिक गुन्हे शाखा व गुप्त बातमीदारांच्या मदतीने पोलिसांनी तांत्रिक विश्लेषण व सीसीटीव्ही तपासणी केली.

त्यातून विनोद ऊर्फ नंदू दत्तात्रय रणधीर (रा. वरवंड) आणि गणेश ऊर्फ अक्षय तानाजी उमाटे (रा. कानिफनाथनगर, वरवंड; मूळ रा. तेर ढोकी, जि. धाराशिव) यांनी संगनमत करून हा खून केल्याचे समोर आले. दोघांना ताब्यात घेऊन चौकशी केली असता त्यांनी गुन्ह्याची कबुली दिली.ही कामगिरी पोलिस अधीक्षक संदीप सिंग गिल, अपर पोलिस अधीक्षक गणेश बिरादार, उपविभागीय पोलिस अधिकारी बापूराव दडस यांच्या मार्गदर्शनाखाली, स्थानिक गुन्हे शाखेचे पोलिस निरीक्षक अविनाश शिळीमकर, यवतचे पोलिस निरीक्षक नारायण देशमुख यांच्या नेतृत्वाखाली पार पडली.

या कारवाईत सहायक पोलिस निरीक्षक प्रवीण संपांगे, महेश माने, पोलिस उपनिरीक्षक सलीम शेख, ग्रेड पोलिस उपनिरीक्षक भोसले, संजय जगदाळे, सहायक फौजदार महेंद्र फणसे आणि इतर कर्मचार्यांचा सहभाग होता. दोन्ही आरोपींना अटक करून त्यांना पोलिस कोठडीत ठेवण्यात आले असून, पुढील तपास पोलिस उपनिरीक्षक एस. जी. शेख करत आहेत.

जाता- जाता लावला खुनाचा छडा

पोलिस उपनिरीक्षक सलीम शेख यांची बदली होऊन पोलिस निरीक्षकपदी पदोन्नती झाली आहे. मात्र, घडल्या खुनाच्या घटनेच्या संदर्भातील छडा लावण्याचे काम शेख यांच्यावर सोपविण्यात आले होते. शेख यांनी अवघ्या दोन दिवसात जाता - जाता आरोपींना जेरबंद केल्याने परिसरातून चांगले काम करणारा अधिकारी तालुक्यातून निरोप घेत असल्याच्या भावना नागरिकांनी व्यक्त केल्या आहेत.

# इतिहासात पहिल्यांदा औद्योगिक वीजदर कपात ; पुढील पाच वर्षांत १०% घट..

पुणे । प्रतिनिधी

आतापर्यंत आपण दरवर्षी वीज दरवाढ करीत आलो आहोत. परंतु, इतिहासात पहिल्यांदाच आपण औद्योगिक वीजदर कपात केली आहे. दरवर्षी सरासरी १.९ टक्के प्रमाणे पुढील पाच वर्षांमध्ये १० टक्के दर कमी होतील. तसेच उद्योगांची भविष्यातील वाढ लक्षात घेऊन प्रकल्प आराखडा तयार केला जाणार आहे. त्यासाठी उद्योजकांनीही सहकार्य करावे, असे आवाहन महावितरणचे अध्यक्ष लोकेश चंद्र यांनी केले.




गणेशखिंड येथील महावितरणच्या प्रादेशिक संचालक कार्यालयात पुणे शहरातील उद्योजक संघटनांसोबत लोकेश चंद्र यांनी संवाद साधला. यावेळी महावितरणचे संचालक सचिन तालेवार, योगेश गडकरी, राजेंद्र पवार, परेश भागवत व दिनेश अग्रवाल, भुजंग खंदारे, मुख्य अभियंता सुनील काकडे यांचेसह शहरातील औद्योगिक संघटनांचे प्रतिनिधी उपस्थित होते.पुण्यातील उद्योजकांची वाढती वीज मागणी लक्षात घेता महावितरणने एमआयडीसीकडे नवीन वीज उपकेंद्रांसाठी जागेची मागणी केली आहे. एमआयडीसी याबाबत सकारात्मक असून, सर्व्हे करून नवीन जागेचा शोध घेतला जाणार आहे.

नवीन जागांसाठी महावितरण आग्रही आहे. तसेच, नव्याने विस्तारित होणाऱ्या औद्योगिक वसाहतींचा बहुत आराखडा तयार करतानाच वीज उपकेंद्रांसाठी जागेचे आरक्षण टाकण्यात यावे यासाठीही महावितरण पाठपुरावा करीत असल्याचे लोकेश चंद्र यांनी सांगितले. दरम्यान, उद्योगांच्या समस्या सोडविण्यासाठी महावितरणने 'स्वागत कक्षा'ची निर्मिती केलेली आहे. प्रत्येक मंडल कार्यालय स्तरावर हा कक्ष कार्यरत राहणार आहे. तसेच, वीजपुरवठा खंडित होण्यामागे अंतर्गत बिघाड हे देखील एक कारण आहे. त्यामुळे उद्योगांनीही 'लोड ब्रेक स्विच'चा वापर करावा, असेही चंद्र यांनी म्हटले आहे.

# शेतकऱ्यांच्या कर्जमाफीचा निर्णय योग्य वेळी; कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांचे प्रतिपादन

नारायणगाव । प्रतिनिधी

केंद्रातील कृषिमंत्री मामा व राज्यातील कृषिमंत्री मी पण मामा, असे दोन्ही मामा मिळून शेतकर्यांच्या उज्वल भवितव्याचा विचार करू तसेच शेतकर्यांच्या कर्जमाफीचा निर्णय मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि दोन्ही उपमुख्यमंत्री अजित पवार व एकनाथ शिंदे योग्य वेळी घेतील, असे प्रतिपादन राज्याचे कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांनी केले.

पुणे जिल्हा सहकारी बँकेच्या पिंपळवंडी शाखेचे नवीन जागी स्थलांतर कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांच्या हस्ते पार पडले, त्या वेळी ते पत्रकारांशी बोलत होते. ते म्हणाले, अनेकदा शेतकरी म्हणतात, शेती व्यवसाय परवडत नाही.

परंतु, नियोजनबद्ध शेती केली तर शेतामधून चार पैसे मिळतात. निसर्गाचा लहरीपणा शेतकर्याला अडचणीत आणतो, ही वस्तुस्थिती आहे. मात्र, भविष्यकाळात शेतकर्याला ऊर्जितावस्था निर्माण करून देण्यासाठी राज्य व केंद्र



सरकारचा प्रयत्न राहील. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका डोळ्यांसमोर ठेवून या निवडणुका महायुती म्हणून लढवायच्या की स्वतंत्र लढवायच्या, याबाबतचा निर्णय आमचे वरिष्ठ घेतील, असे भरणे यांनी सांगितले.शेतकर्यांना कर्जमाफी कधी मिळणार? याबाबत विचारणा केली असता ते म्हणाले की, राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व उपमुख्यमंत्री पवार, शिंदे याबाबतचा निर्णय योग्य वेळी घेतील, असे सांगत त्यांनी याविषयी अधिक बोलण्याचे टाळले तसेच शेतकर्यांना खते घेताना इतर खतांची सक्ती केली जाते. यावर भरणे यांनी माहिती घेऊन योग्य निर्णय घेऊ, असे सांगितले.

विरोधकांच्या आरोपांत तथ्य नाही

विधानसभा निवडणुकीत महायुतीला घवघवीत यश मिळाले असून, विरोधक आपला पराभव झाकण्यासाठी ईव्हीएम मशिनला दोष देत आहेत. सरकारला बदनाम करीत आहेत. परंतु, त्यांच्या बोलण्यात काही तथ्य नाही. तसे झाले असते तर आमच्या पक्षाचे आमदार पराभूत झाले असते का? त्यामुळे त्यात अजिबात तथ्य नाही. शरद पवार हेसुद्धा या विषयावर बोलतात. परंतु, याबाबत मी अधिक बोलणे उचित नाही. त्यास मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्री अजित पवार योग्य उत्तर देतील.

# पुण्यात २०० एमएलडी जलशुद्धीकरण प्रकल्प ; २ टप्प्यांत २३ गावांना पाणीपुरवठा..



पुणे । प्रतिनिधी

महापालिकेत नव्याने समाविष्ट झालेल्या २३ गावांपैकी केवळ ९ गावांना सध्या पाणीपुरवठा होत आहे. उर्वरित गावांना पाणी देण्यासाठी पालिका २०० एमएलडी क्षमतेचा जलशुद्धीकरण प्रकल्प उभारणार आहे. खडकवासला धरणाजवळील केंद्रीय जल व विद्युत संशोधन केंद्राच्या चार हेक्टर जागेत प्रकल्प उभारण्याचा प्रस्ताव अंतिम टप्प्यात आहे.हा प्रकल्प आधी पाटबंधारे विभागाच्या जागेत उभारला जाणार हता. संरक्षण आणि पाटबंधारे विभागातील वादामुळे ती जागा मिळू शकली नाही.

त्यामुळे पालिकेने केंद्रीय जल व विद्युत संशोधन संस्थेकडे जागेची मागणी केली. त्याला संबधित संस्थेने तत्त्वतः संमती दिल्याचे प्रशासनाने सांगितले. एकूण ८०१ कोटी रूपयांचा हा प्रकल्प असून, दोन टप्प्यांत राबविला जाणार आहे. पहिल्या टप्प्यात जलशुद्धीकरण केंद्र उभारण्यासाठी ५१० कोटी रुपयांची मागणी शासनाकडे केली आहे. पहिल्या टप्प्यात नदीकाठच्या भागांसह एकूण १४ गावांना तसेच दुसऱ्या टप्पानंतर उर्वरित ९ गावांनाही शुद्ध पाणीपुरवठा होणार आहे. दुसऱ्या टप्प्यात जलवाहिनी टाकणे आणि आवश्यक भूसंपादनाची कामे होणार आहेत.

सध्या या गावांमध्ये टँकरद्वारे किंवा रॉ-वॉटरच्या मार्गाने पाणी दिले जाते. शासनाने पालिकेला पाणीपुरवठा प्रकल्प सादर करण्याच्या सूचना दिल्यानंतर हा आराखडा तयार केला. नुकताच प्राथमिक आराखडा अतिरिक्त आयुक्त एम. पी. जे. प्रदीप चंद्रन यांना सादर केला असून लवकरच प्रत्यक्ष जागेची पाहणी करून पुढील निर्णय घेतला जाईल असे पालिकेतून सांगण्यात आले.



# नसरापूरमध्ये आजी-माजी सैनिकांसमवेत रक्षाबंधनाचा उत्साहपूर्ण सोहळा

नसरापूर । प्रतिनिधी

देशाच्या रक्षणासाठी प्राणपणाला लावणाऱ्या सैनिकांचा सन्मान आणि रक्षाबंधनाचा उत्सव नसरापूर येथे उत्साहात साजरा झाला. तनिष्का व्यासपीठाच्या वतीने विठ्ठल-रुख्मिणी मंदिर सभागृहात आयोजित या सोहळ्यात आजी-माजी सैनिकांना राखी बांधून गौरविण्यात आले. कार्यक्रमास भोरचे माजी सभापती लहुनाना शेलार, उपसरपंच नामदेव चव्हाण, गणेश दळवी, सुशील विभुते, वैशाली झोरे यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

अनिल शेटे, विलास शेटे, भानुदास शेटे, सुनील राऊत, प्रवीण जगताप यांच्यासह अनेक सैनिकांना स्मृतीचिन्ह देऊन सत्कारण्यात आले. तनिष्का सदस्य आणि ग्रामस्थ महिलांनी सैनिकांना राख्या बांधून समाजातील महिलांच्या सुरक्षेसाठी तत्पर राहण्याची भावनिक विनंती केली. माजी सैनिक अनिल शेटे यांनी तरुणांनी देशसेवेसाठी सैन्यात सामील होण्याचे आवाहन केले. सुशील विभुते यांनी प्रत्येक नागरिकाने आपल्या क्षेत्रात प्रामाणिकपणे काम करून राष्ट्रनिर्मितीत योगदान द्यावे, असे सांगितले.

# दोन कोटींचा प्लॉट खोटी कागदपत्रे तयार करून हडपण्याचा डाव; बारामती तालुक्यात खळबळ

भवानीनगर - बारामती एमआयडीसीतील समर्थ एंटरप्रायजेसच्या मालमत्तेवर खोटी कागदपत्रे तयार करून सुमारे दोन कोटी रुपयांची मालमत्ता हडपण्याचा प्रयत्न केल्याप्रकरणी चंद्रकला सुरेश किनिंगे आणि सुरेश आण्णासो किनिंगे यांच्याविरुद्ध बारामती ग्रामीण पोलीस ठाण्यात २२ जून २०२५ रोजी गुन्हा दाखल झाला आहे. याप्रकरणी भादवि कलम ३१६(२), ३१८(४), ३३८(३), ३४०(१), ३४०(२) अंतर्गत कारवाई करण्यात आली आहे.

प्राप्त माहितीनुसार, एमआयडीसी बारामती येथील प्लॉट क्रमांक एफ ३३ वर असलेल्या समर्थ एंटरप्रायजेसमध्ये रजिस्टर भागीदार असलेले उद्योजक अविनाश अर्जुन सावंत (रा. काटेवाडी, ता. बारामती) यांची बोगस लेटरहेड तयार करून त्यांच्या संमतीचे खोटे दस्तऐवज बनवण्यात आले. आरोपींनी महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीतील विद्युत कनेक्शन स्वतःच्या नावे करून घेतले. तसेच, पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेतील संयुक्त खात्याचा गैरवापर करून बारामती येथील एचडीएफसी बँकेच्या गालींदे नगर, भिगवण रोड शाखेत स्वतःला प्रोप्रायटर दाखवून आर्थिक गैरव्यवहार केले. यासाठी बनावट पॅन, जीएसटी क्रमांक आणि रहिवासी पुराव्याचा वापर करण्यात आला.सदर भागीदारी रजिस्टर असताना आणि ब्रिज ऑफ अग्रीमेंट झाले असतानाही आरोपींनी अविनाश सावंत यांना आर्थिक ताळेबंद देण्यास टाळाटाळ केली. याबाबत कायदेशीर नोटीस देऊनही कोणताही प्रतिसाद न मिळाल्याने सावंत यांनी पोलिसांत तक्रार दाखल केली. तपासाअंती २२ जून रोजी गुन्हा नोंदवण्यात आला.

गुन्हा दाखल झाल्यानंतर आरोपींनी संगनमताने २६ जून रोजी बापू ज्योतिबा सोनवणे (रा. बांदलवाडी, ता. बारामती) यांना पाच महिन्यांसाठी कुलमुखत्यारपत्र दिले, ज्यामध्ये ते व्यवसायासाठी अमेरिकेत जात असल्याचे नमूद केले. मात्र, हे कुलमुखत्यारपत्र बेकायदेशीर असल्याचे सावंत यांच्या लक्षात आले. त्यांनी असा संशय व्यक्त केला की, या कुलमुखत्यारपत्राचा उद्देश ट्रॉसिटीचा खोटा गुन्हा दाखल करून पूर्वीचा गुन्हा दडपण्यासाठी आणि दबाव टाकण्यासाठी होता. यामुळे सावंत यांनी तातडीने हे कुलमुखत्यारपत्र रद्द करण्याची मागणी करत बारामती कोर्टात दाद मागितली. ॲड. सतीश दळवी यांनी केलेला युक्तिवाद ग्राह्य धरून ३१ जुलै रोजी कोर्टाने अंतरीम आदेश जारी केला. याप्रकरणाचा तपास सुरू आहे.

या घटनेमुळे भागीदारी व्यवसाय आणि विश्वासार्हतेबाबत प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. भागीदारांमधील विश्वासाला तडा गेल्याने उद्योजकांमध्ये अस्वस्थता पसरली आहे.

# आधारकार्ड लिंकच्या नावाखाली ६ एकर जमीन लाटली

सासवड । प्रतिनिधी

मांडकीतील शेतकर्याची आधारकार्ड लिंक करण्याच्या नावाखाली सहा एकर जमीन लाटण्याचा प्रकार उघडकीस आला आहे. याप्रकरणी किरण आनंदा भंडलकर (रा. मांडकी ता. पुरंदर), सौरभ दादा शितोळे (रा. साखर कारखान्याजवळ कासारसाई, पुणे) यांच्यावर सासवड पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत रूपाली नरेंद्र जाधव (रा. मांडकी, ता. पुरंदर) यांनी फिर्याद दिली आहे.

रूपाली जाधव यांनी फिर्यादीत म्हटले आहे की, पती नरेंद्र जाधव व दीर दौलत ज्ञानेश्वर जाधव यांच्या नावावर मांडकी येथे वडिलोपार्जित गट. क्र. ८९६ मध्ये प्रत्येकी ८० आर असे एकूण १६० आर क्षेत्र आहे. व गट क्र. ३०८/२ मध्ये प्रत्येकी ४५ असे एकूण ९० आर क्षेत्र आहे. पती व दीर यांचे दोन्ही गटातील एकूण क्षेत्र ६ एकर १० गुंठे आहे. दीर हे अविवाहीत असून, ते गेले ६ वर्षांपासून घर सोडून निघुन गेले आहेत, ते अद्यापर्यंत घरी आलेले नाहीत. पतीस दारूचे व्यसन आहे. ते सतत दारूच्या नशेत असतात. पती व आमच्या गावातील गणेश तात्याबा रांजणे हे जवळचे मित्र आहेत. गणेश रांजणे यांनी पतीची आणि किरण भंडलकरची काही दिवसापूर्वी ओळख करून दिली होती. त्यामुळे पती नरेंद्र जाधव, गणेश रांजणे व किरण भंडलकर यांची चांगली मैत्री आहे.

पती व ते दोघेजण अधुनमधुन एकत्र दारू पित असायचे १८ व १९ जून रोजी गणेश रांजणे यांनी त्यांच्या चारचाकी गाडीमधून पती नरेंद्र जाधव यांच्याकडे काम आहे, असे सांगून, गाडीमध्ये घेऊन गेले. पतीस दोन दिवस दारूच्या नशेत रात्री उशिरा घरी सोडले होते.

त्यानंतर २० जून रोजी गणेश रांजणे हे म्हणाले की, नरेंद्र जाधव व आम्ही दारूची पार्टी करायला जाणार आहे. पतीला दारूच्या नशेत रात्री उशिरा घरी सोडले. २१ जून रोजी पतीला विचारणा केली असता, त्यांनी सांगितले की, काल मला गणेश रांजणे, राजेंद्र शिंदे, किरण आनंदा भंडलकर व त्याचा मित्र सौरभ दादा शितोळे हे त्यांच्या चारचाकी गाडीमध्ये जेजुरी येथे महाराजा हॉटेलवर घेऊन गेले होते. तेथे सर्व जण दारू पिले. त्यानंतर मला सासवड येथे घेऊन आले. तुझे आधारकार्ड लिंक करायचे आहे, असे म्हणून त्यांनी माझी ४ ते ५ ठिकाणी सही घेतली. मी पूर्ण दारूच्या नशेत होतो. मला काही एक समजत नव्हते.

२० जून रोजी तुझे वडिलांनी तुमची मांडकी येथे असलेल्या जमिनीचे साठेखत व कुलमुखत्यार दस्त करून दिलेले आहे. यापुढे तुम्ही शेतात जायचे नाही, अशी जीवे मारण्याची धमकी दिली. त्यानंतर मी व मुलगा आम्ही दुय्यम निबंधक कार्यालय, सासवड येथे जाऊन चौकशी केली असता, माझे पती व दीर दौलत ज्ञानेश्वर जाधव यांच्या नावे असलेल्या मांडकी येथील वडिलोपर्जित शेतजमीन गट क्र. ८९६ मधील १६० आर क्षेत्राचे साठेखत दस्त क्र. ६४९५/२०२५ व कुलमुखत्यारपत्र दस्त क्र. ६४९६/२०२५ व गट क्र. ३०८/२ मधील ९० आर क्षेत्राचे साठेखत दस्त क्रमांक ६४९७/२०२५ व कुलमुखत्यारपत्र दस्त क्र. ६४९८/२०२५ २० जून रोजी किरण आनंदा भंडलकर व सौरभ दादा शितोळे यांच्या नावे केल्याचे समजले.दस्तामध्ये नमूद केलेली रोख रक्कम पती यांना दिलेली नाही. दस्तामध्ये नमूद केलेले कोणतेही चेक माझे पती यांना दिले नाहीत. तसेच माझे दीर दौलत जाधव हे गेले ५ ते ६ वर्ष परागंदा झालेले असतानादेखील त्यांच्याही नावे असलेल्या क्षेत्राचे बेकायदेशीर साठेखत व कुलमुखत्यारपत्र करून आरोपी यांनी त्यांचे नावे करून घेतले आहे. तसेच दस्तावर नमूद केलेली रोख रक्कम माझे पती व मला दिली नसून, दस्तातील नमूद चेकदेखील माझे पती अगर मला दिले नाहीत. आमची फसवणूक केली आहे.सासवड शहर आणि ग्रामीण भागात बेकायदेशीररित्या जमीन लाटली असेल तर त्यांची नावे व माहिती सासवड पोलिसांना कोणतीही भीती न बाळगता द्यावी. दोषींवर कडक कारवाई करण्यात येईल.

- ऋषिकेश अधिकारी, पोलिस निरीक्षक, सासवड